रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १८ ◆ अंक ३३५
www.ramprahar.com

◆ मंगळवार, २३ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

देशात सात बुलेट ट्रेन कॉरिडॉरला मंजुरी/२
रायगडात होम स्टे, लॉजसाठी कडक नियमावली/५
किकबॉक्सिंगमध्ये 'पनवेल सिटी'ची दमदार कामगिरी/८

## मान्सूनची आगेकूच; राज्यात अनेक ठिकाणी हजेरी



**पुणे :** राज्यातील काही भागात ८ जून रोजी मान्सून दाखल झाला होता. यानंतर मान्सून पुढे सरकत नव्हता. गेल्या १४ दिवसांच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर महाराष्ट्रात मान्सून पुन्हा एकदा सक्रिय होताना दिसत आहे. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार मान्सून राज्यातील विविध भागांमध्ये दाखल झाला. येत्या २४ ते ४८ तासांत तो इतर भागांत पोहचण्याची दाट शक्यता आहे. येत्या २७ आणि २८ जूननंतर कोकण किनारपट्टीसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या काळात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. एल निनोमुळे मान्सूनची वाटचाल मंदावली होती, परंतु आता पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.


# 'विधान परिषदे'त महायुतीची बाजी

## महाविकास आघाडीचा निवडणुकीत दारूण पराभव

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकीचा निकाल सोमवारी (दि.२२) जाहीर झाला असून महायुतीने या निवडणुकीत एकतर्फी विजय मिळवला आहे. एकूण १७ जागांपैकी तब्बल १६ जागा महायुतीच्या उमेदवारांनी जिंकल्या. नाशिकमध्ये एका जागेवर अपक्ष उमेदवार निवडून आला, तर विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीला या निवडणुकीत विजयाचे खातेच उघडता आले नाही.

या निवडणुकीत सहा जागांवर महायुतीने आधीच बिनविरोध विजय मिळवला होता. यामध्ये रवींद्र फाटक (ठाणे), अनिकेत तटकरे (कोकण), विक्रम काकडे (पुणे), प्राजक्त तनपुरे (अहिल्यानगर), दुष्यंत चतुर्वेदी (यवतमाळ) आणि अरुण लखानी (वर्धा–गडचिरोली–चंद्रपूर) यांचा समावेश आहे. उर्वरित ११ जागांसाठी १८ जून रोजी मतदान पार पडले, ज्याचा निकाल



सोमवारी जाहीर करण्यात आला.

या निकालानुसार भाजपने ११ जागा लढवल्या आणि सर्व जिंकल्या आहेत. शिंदे शिवसेनेने चार जागा लढवून तीन जागी बाजी मारली. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने दोन जागा लढवल्या आणि दोन्ही जागांवर विजय मिळवला, तर एक जागा अपक्ष उमेदवाराच्या वाट्याला गेली. या निवडणुकीत महाविकास आघाडी पूर्णपणे अपयशी ठरली असून त्यांना एकही जागा जिंकता आली नाही.

> *पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे यशस्वी नेतृत्व, केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या मार्गदर्शनातून भाजप महायुतीने महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीत दणदणीत विजय मिळवला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, विधिमंडळातील सहकारी, नगरसेवक आणि तमाम कार्यकर्त्यांचे परिश्रम अत्यंत मोलाचे आहेत. सर्व विजयी उमेदवारांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा!*
>
> **–देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

### निवडून आलेले उमेदवार

सुहास शिरसाट (भाजप) : छत्रपती संभाजीनगर–जालना मतदारसंघ, अविनाश ब्राह्मणकर (भाजप) : भंडारा–गोंदिया मतदारसंघ, धैर्यशील कदम (भाजप) : सांगली–सातारा मतदारसंघ, सय्यद खान (शिंदेसेना) : परभणी–हिंगोली मतदारसंघ, राजेंद्र राऊत (भाजप) : सोलापूर मतदारसंघ, बसवराज पाटील (भाजप) : धाराशिव–लातूर–बीड मतदारसंघ, राजीव पोतदार (भाजप) : नागपूर मतदारसंघ, नंदकिशोर महाजन (भाजप) : जळगाव मतदारसंघ, प्रवीण पोटे (भाजप) : अमरावती मतदारसंघ, अमर राजूरकर (भाजप) : नांदेड मतदारसंघ, गोकुळ गीते (अपक्ष) : नाशिक मतदारसंघ.

## 'उबाठा'चे सहा खासदार शिवसेनेत

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा फुटीर खासदारांनी सोमवारी (दि.२२) उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. मुंबईत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी संजय जाधव, नागेश पाटील–आष्टीकर, संजय देशमुख, ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे, संजय पाटील या खासदारांनी शिवसेनेचा झेंडा हाती घेतला.

शिवसेना हे एक कुटुंब असून कट्टर शिवसैनिक खासदार आमच्यासोबत आले आहेत, असे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नवीन सदस्यांचे स्वागत केले. परभणीचे संजय जाधव, यवतमाळचे संजय देशमुख आणि ईशान्य मुंबईचे संजय पाटील यांच्या पक्षप्रवेशामुळे



आता आमच्याकडे 'ट्रिपल संजय'ची ताकद आली आहे. आमच्याकडे चौथा संजय राठोड आहे. भरपूर संजय आहेत. त्यामुळे बाकी कुणाबद्दल मी बोलतोय ते सांगायची गरज नाही, असे म्हणत उपमुख्यमंत्री शिंदेंनी टोला लगावला.

विरोधकांकडून धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर 'रीलस्टार' म्हणून केलेल्या टीकेचा खरपूस समाचार घेत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी ओमराजेंची पाठराखण केली. ओमराजे हे रील स्टार नसून जनतेच्या मनातील 'रिअल स्टार' आहेत, असे त्यांनी म्हटले.

चार वर्षांपूर्वी जेव्हा आम्ही उठाव केला, तेव्हा ४० आमदार सोबत होते. आज आम्ही चौकार नाही, तर थेट षटकार मारला आहे. हे एक नाही, तर आमचे सहा 'टायगर' आहेत, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री शिंदेंनी ठाकरे गटावर प्रहार केला.

## लखनऊमध्ये अग्नितांडव; १४ जणांचा मृत्यू

**लखनऊ : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊमध्ये सोमवारी (दि.२२) एका इमारतीला लागलेल्या भीषण आगीत १४ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

लखनऊमधील अलीगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पुरनिया भागात ही दुर्घटना घडली. जिथे आग लागली त्या



इमारतीच्या वरच्या मजल्यावर 'गेमिंग झोन' चालवला जात होता. या ठिकाणी तरुण कर्मचारी गेमिंग सॉफ्टवेअरवर काम करीत होते. अचानक लागलेल्या आगीमुळे काही मिनिटांतच संपूर्ण इमारत धूर आणि आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

या दुर्घटनेची मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गंभीर दखल घेत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही जीवितहानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून मृतांच्या नातेवाइकांना दोन लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

## अपघातात दोघींचा मृत्यू, तिघे जखमी

**सावंतवाडी : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावर नेमळे–एरंडोकवाडी येथे सोमवारी (दि.२२) दुपारी सव्वादोन वाजण्याच्या सुमारास थार कार रस्त्याच्या बाजूला असलेल्या सुमारे २० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात दोन महिलांचा मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

गोवा सालीगाव येथून कणकवली भिरवंडे येथे जात असताना कारचालकाला डुलकी लागल्याने हा अपघात घडला.

## १७ हजार ७०६ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सोमवारी (दि. २२) मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तब्बल १७ हजार ७०६.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहांत सादर करून नवा विक्रम नोंदवला. या पुरवणी मागण्यांचे वैशिष्ट्य म्हणजे सरकारने नुकतीच घोषणा केलेल्या शेतकरी कर्जमाफीसाठी तब्बल ४० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.




यामध्ये आधीच्या कर्जमाफीतील प्रलंबित बोजासाठी २०० कोटी, तर आताच जाहीर करण्यात आलेल्या नव्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

एकूण १७ हजार ७०६ कोटी रुपयांच्या या स्थूल पुरवणी मागण्या असल्या तरी विविध तांत्रिक समायोजने आणि केंद्र सरकारच्या मदतीचा परतावा लक्षात घेता राज्याच्या तिजोरीवर प्रत्यक्ष निव्वळ अतिरिक्त भार ७४ हजार ८१७.६६ कोटी रुपयांचा पडणार आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागासाठी सर्वाधिक २२ हजार ०१५.४२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यातील बहुतांश हिस्सा हा शेतकरी कर्जमुक्ती आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवल (७७७ कोटी रुपये) देण्यासाठी वापरला जाणार आहे.

कर्जमाफीसोबतच सरकारने शहरी आणि ग्रामीण पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद केली आहे. नगरविकास विभागासाठी तिसऱ्या क्रमांकाची म्हणजेच तब्बल १५ हजार १५२.४३ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

## निवडक

### ममता बॅनर्जींना मोठा धक्का! थेट पक्षाध्यक्षपदावरून हटवले

**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष आणि पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का बसला आहे. ऋतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर आमदारांच्या गटाने ममता यांना पक्षाच्या अध्यक्षपदावरून हटवले आहे. तर अभिषेक बॅनर्जी यांना थेट पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. बंडखोर आमदारांच्या गटाची बैठक झाली. या बैठकीत ज्येष्ठ आमदार अरूप रॉय यांची नव्याने स्थापन झालेल्या संघटनात्मक समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

### स्पेनचा युवा फुटबॉलपटू लमीन यामालचा ऐतिहासिक गोल

**अटलांटा :** फिफा विश्वचषक स्पर्धेत युरोपियन चॅम्पियन स्पेनने दमदार कामगिरी करत सौदी अरेबियाचा ४–० अशा फरकाने पराभव केला. यामध्ये स्पेनचा युवा फुटबॉलपटू लमीन यामाल याने वयाच्या १८ वर्षे, ११ महिने आणि आठ दिवसांत गोल करून अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीचा विक्रम मोडीत काढला आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महाराजस्व शिबिर

**मुंबई : प्रतिनिधी**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत राज्यात २१, २२ आणि २३ जुलै रोजी विधानसभा मतदारसंघनिहाय शिबिर राबविण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

संबंधित मतदारसंघातील जनतेची निकड लक्षात घेता शिबिराच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांना लाभ द्यावा. यासाठी विभागीय आयुक्त स्तरावर शिबिराचा विषय लाभार्थ्यांची होणारी संख्या ठिकाण आणि दिनांक याबाबत रूपरेषा ठरविण्यात यावी. जमाबंदी आयुक्त व नोंदणी महानिरीक्षक यांच्या स्तरावरून नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. प्रत्येक विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी व तालुका स्तरावरील महसूल यंत्रणेसमवेत दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे दररोज बैठक आयोजित करावी यावर बैठकीत एकमत झाले.

या शिबिराचे यशस्वी आयोजन करून अधिकाधिक लाभार्थ्यांना लाभ द्यावा. अभियानाचा उद्देश हा संबंधित भागातील नागरिकांचे प्रश्न सोडवून त्यांना महसूल यंत्रणेच्या माध्यमातून विविध लाभ देण्याचा आहे. शिबिरामधील लाभार्थ्यांना विनासायास लाभ मिळवून देण्यासाठी शिबिराच्या यशस्वी आयोजनाकरिता निधीची तरतूद करण्यात यावी, अशा सूचनाही महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिल्या.

या महाअभियानाच्या माध्यमातून राज्यातील तब्बल ५० लाख कुटुंबांपर्यंत शासकीय सेवा आणि विविध योजनांचे लाभ थेट पोहचविण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे सर्वसामान्यांचे महसूल दप्तरी असणारे प्रलंबित प्रश्न निकाली निघणार आहेत.





**पुणे : केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे वडील किसनराव दगडोबा मोहोळ यांचे नुकतेच निधन झाले. या पार्श्वभूमीवर रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी त्यांच्या निवासस्थानी भेट देत आदरांजली अर्पण केली तसेच मोहोळ कुटुंबीयांचे सांत्वन केले.**

## रायगडात पावसाच्या सरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

मृग नक्षत्र कोरडे घालवल्यानंतर आर्द्रा नक्षत्राच्या पहिल्या दिवशी रायगड जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यातील बहुतांश भागात पावसाच्या सरी कोसळल्या. अलिबाग, मुरूड, महाड, पोलादपूर येथे चांगला पाऊस पडला.

रायगड जिल्ह्यात साधारणपणे जूनच्या पहिल्या आठवड्यात पावसाला सुरुवात होते, पण यंदा एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनचे आगमन लांबले. जिल्ह्यातील अनेक भागात तापमानाचा पारा चाळीशीपार जात होता. हवेतील आर्द्रतेचे प्रमाणही कमालीचे वाढले. त्यामुळे असह्य उकाडा जाणवत होता. रायगडकर पावसाच्या आगमनाची प्रतीक्षा करीत असताना अखेर पाऊस आला.

दक्षिण रायगडला मुसळधार पावसाने झोडपून काढले.



सोमवारी पहाटेही जिल्ह्यातील बहुतांश भागात वादळी वाऱ्यांसह पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. त्यामुळे असह्य उकाड्यातून रायगडकरांना दिलासा मिळाला आहे.

जिल्ह्यात मुरूड येथे सर्वाधिक ४६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. अलिबाग येथे २८ मिमी, पोलादपूर २५ मिमी, महाड १६ मिमी, उरण १५ मिमी आणि माणगावमध्ये १५.७ मिमी पावसाची नोंद झाली. दरम्यान, पुढील दोन दिवस पावसाच्या जोरदार सरी कोसळतील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

## पनवेल मनपा स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेची स्थायी समितीची सभा सोमवारी (दि. २२) महापालिका मुख्यालयात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजुरी देण्यात आली.

या सभेस स्थायी समितीचे सर्व सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, सचिव नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महापालिकेकरिता २० फिरती स्वच्छतागृहे/मोबाइल टॉयलेट तीन वर्षांच्या वॉरंटीसह खरेदी करणे या कामाच्या न्यूनतम दराची निविदा मंजूर करण्यास मंजुरी देण्यात आली. महापालिका मालकीच्या प्रभाग समिती क मधील सर्व सार्वजनिक व कार्यालयांमधील शौचालयांचे सुशोभीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे या कामी



न्यूनतम दराची निविदा मंजुरीस स्थायी समितीने मंजुरी दिली. मनपा हद्दीत उद्यानांमध्ये विविध ठिकाणी आवश्यक असणाऱ्या खेळण्यासाठी रबर फ्लोरिंग बसविण्याच्या विषयाची माहिती घेऊन विषयास मंजुरी देण्यात आली.

महापालिका हद्दीतील तक्का येथील अं.मु.क्र. ४५६ ते १९०/२ अ (मोराज सोसायटी रस्ता) येथील रस्ता काँक्रीटीकरण करण्याच्या विषयास मंजुरी देण्यात आली. प्रभाग समिती क, प्रभाग क्र.१३ मधील प्लॉट क्र. ०८, सेक्टर ३२ कामोठे येथे ख्रिश्चन समाजाकरिता दफनभूमी विकसित करणे या विषयाची सविस्तर माहिती घेत विषयास मंजुरी दिली गेली.

प्रभाग समिती अ,ब व ड इतरमध्ये रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्सवर वेळोवेळी आवश्यकतेनुसार सन २०२४–२५ व सन २०२५–२६ या दोन वर्षांकरिता झाकणे व किरकोळ दुरुस्ती करणे या कामासाठी सुधारित वाढीव अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

प्रभाग समिती अ, ब, क, ड व इतरमध्ये समाविष्ट होणाऱ्या गटारांची सन २०२३–२४ व सन २०२४–२५ या दोन वर्षांकरिता रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्सवर वेळोवेळी आवश्यकतेनुसार एफआरपीची झाकणे लावणे व किरकोळ दुरुस्ती करण्याच्या विषयाची माहिती देऊन मंजुरी देण्यात आली. प्रभाग समिती अ व ब प्रभाग कार्यालय (वॉर्ड ऑफिस) येथे फर्निचर व इतर अनुषंगिक कामे करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली गेली.

महापालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या विकासकामात अडथळा निर्माण करणारे महावितरण कंपनीचे विद्युत खांब, विद्युत वाहिन्या स्थलांतरित करणे व नवीन वीजपुरवठा घेणेकामी विद्युत व्यवस्थेची अनुषंगिक कामे दोन वर्षांकरिता करण्याच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

प्रभाग समिती क व ड क्षेत्रामधील रस्त्यावरील पथदिवे (सिडको हस्तांतरीत पथदिवे वगळून) व प्रशासकीय कार्यालये, शाळा, फिश मार्केट, स्मशानभूमी, पाण्याची टाकी, भाजी मार्केट, डॉ. आंबेडकर भवन, आरोग्य केंद्र, रुग्णालये, पादचारी उन्नत मार्ग (एफओबी) व इतर इमारती इत्यादी ठिकाणांच्या विद्युत व्यवस्थेची दोन वर्षांकरिता निगा, देखभाल, दुरूस्ती, सुधारणा व नूतनीकरण करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिका मालकीच्या इमारतीमधील विविध प्रकारच्या (स्प्लिट/विंडो/कॅसेट) व विविध क्षमतेच्या (१, १.५, २ टीआर) वातानुकूलित यंत्रणांची तीन वर्षांकरिता निगा, देखभाल व दुरुस्ती करणे या कामाची न्यूनतम निविदा मंजूर करण्याच्या विषयास मंजुरी देण्यात आली.

महापालिका क्षेत्रातील विविध ठिकाणच्या उद्यानांत डेकोरेटिव्ह पथदिवे उभारून कार्यान्वित करणे विषयास मंजुरी देण्यात आली. (पान २ वर..)

# प्रत्येक गावात वेदर स्टेशन बसवण्यासाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठवणार -कृषीमंत्री भरणे

**मुंबई : प्रतिनिधी**

फळपीक विमा योजनेतील शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची अचूक भरपाई मिळवून देण्यासाठी राज्यातील प्रत्येक गावात ‘वेदर स्टेशन‘ बसवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी केंद्र शासनाकडे लवकरच प्रस्ताव पाठवण्यात येईल, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

पालघर जिल्ह्यातील हवामान आधारित फळपीक विमा योजनेतील अनियमितता, शेतकऱ्यांना न मिळालेली नुकसानभरपाई आणि प्रलंबित तक्रारींबाबत मंत्रालयात एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत कृषिमंत्री बोलत होते. या बैठकीला आमदार मनीषा चौधरी,



कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक विनयकुमार आवटे, विमा कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी आणि शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

डहाणू आणि बोईसर येथील शेतकऱ्यांनी विम्याचा हप्ता भरूनही त्यांची नोंदणी पूर्ण झाली नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी जिल्हाधिकारी पालघर यांनी करण्याचे निर्देश कृषिमंत्र्यांनी दिले.प्रत्येक गावात वेदर स्टेशन उभारण्यासाठी शासन आग्रही आहे. गावागावात हवामान केंद्र झाल्यास, निसर्गाच्या लहरीपणामुळे प्रत्यक्ष झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचा आकडा आणि विम्याचे निकष यांची तंतोतंत जुळवणी करणे शक्य होईल, ज्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान टळेल असेही कृषीमंत्री भरणे म्हणाले.

विमा कंपन्या, बँका आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपापसातील समन्वय वाढवून प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत. कोणताही पात्र शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे कडक निर्देशही कृषीमंत्री भरणे यांनी यावेळी दिले.

# अलिबाग शहराजवळ विजेचा खांब पडला, वाहतूक विस्कळीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग परिसरात सोमवारी झालेल्या पावसाने शहराच्या वेशीवर असलेला विजेचा खांब पहाटेच्या सुमारास पडला. त्यामुळे शहरातील काही भागातील वीज पूरवठा खंडीत झाला होता. रेवस-अलिबाग मार्गावरील वाहतूक वळवून वीजवाहिनी दुरूस्त करण्याचे काम करण्यात आले. त्यामुळे अलिबाग-रेवस मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

अलिबाग परिसरात सोमवारी पहाटेच्या सुमारास पावसाने हजेरी लावली. पहाटेच्या सुमारास पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. पहिल्याच पावसात



अलिबाग शहरालगत असलेला महावितरणचा विजेचा एक खांब दुकानांवर कोसळला. खांबावरील वीज वाहिन्या तुटून आसपासच्या परीसरात लटकत होत्या. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली . याच परिसरात सकाळी आठ ते नऊच्या शेकडो बिगारीकामगार कामावर जाण्यासाठी एकत्र येत असतात. या दरम्यानच्या काळात ही घटना घडली असती तर मोठा अनर्थ घडला असता.

या दुर्घटनेमुळे अलिबाग परिसरातील वीज पुरवठा काही काळ खंडीत झाला होता. महावितरणच्या पथकांनी दहाच्या सुमारास हा वीजेचा खांब बदलून नविन खांब टाकण्याचे काम हाती घेतले. यावेळी अलिबागकडून रेवसच्या दिशेने जाणारी आणि येणारी वाहतूक रोखून धरण्यात आली होती. त्यामुळे ऐन गर्दीच्या वेळी वाहनचालक आणि प्रवाश्यांची मोठी गैरसोय झाली. वीज वाहीन्या जोडण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

# पुनर्विकास प्रकल्पातील मिक्सर ट्रक घुसला संकुलात

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर ९ मधील एका पुनर्विकास प्रकल्पाच्या ठिकाणाहून निघालेला काँक्रीट मिक्सर ट्रक सोमवारी शेजारील जेएन-४ गृहनिर्माण संकुलात घुसला. ट्रकचे ब्रेक निकामी झाल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, अशी माहिती जेएन-४ गृहनिर्माण संस्थेचे सचिव विनय तलाटी यांनी दिली.

स्थानिक रहिवाशांच्या मते, चालक माजी जेएन-२



वसाहतीतील अरुंद रस्त्यावरून ट्रक मागे घेत चढाच्या रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न करत असताना त्यावरील नियंत्रण सुटले.हा पुनर्विकास प्रकल्प गोदरेज प्रॉपर्टीज कंपनीकडून राबविला जात आहे.हा रस्ता अत्यंत अरुंद असून येथे बांधकामाशी संबंधित अवजड वाहनांची नेहमीच वर्दळ असते.

# भारतात वेगवान प्रवास सुरू होणार; सात बुलेट ट्रेन कॉरिडॉरला मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

रेल्वे मंत्रालयाने सात नव्या बुलेट ट्रेन कॉरिडॉरला मंजुरी दिली आहे. भारतात हायस्पीड रेल्वेच वेगवान प्रवास सुरु होणर आहे. यासाठी रेल्वे नेटवर्कचा विस्तार केला जात असून यामुळे भारतातील प्रमुख शहरे हायस्पीड रेल्वेने जोडली जाणार असल्याची घोषणा केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यानी केली आहे .

यामध्ये बंगळुरू, चेन्नइे, हैदराबाद, पुणे, मंबई, दिल्ली, लखनऊ, वाराणसी, सिलीगुडी, पाटणा अशी शहरे या रेल्वेने जोडली जाणर आहेत. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही घोषणा केली आहे. मुंबई-पुणे हायस्पीड रेल्वे ४८ मिनिटांत जाणार आहे.

दिल्ली-सिलीगुडी : ६ तास, दिल्ली-वाराणसी : ३ तास १५ मिनिटे, दिल्ली-लखनऊ : १ तस २ मिनिटे, पुणे-हैदराबाद : २ तास, बेंगलूर चेन्नई १ तास, बेंगलुरु-हैदराबाद : २ तास असा वेळ लागणर आहे. या हायस्पीड मार्गामुळे भारताच्या प्रमुख शहरांच्या प्रवासाचा वेग वाढणार असून प्रवासाला लागणारा वेळ कमी होणार आहे. त्यामुळे भारतातील अंतर्गत शहरांच्या कनेक्टीवीटीला वेग येणार आहे.



मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचा मार्ग वेगाने बांधला जात असताना आता केंद्र सरकारने देशभरात सात नवीन बुलेट ट्रेन कॉरिडॉरला मंजुरी दिली आहे. यामुळे प्रमुख शहरातील प्रवासाची वेळ कमी होणारा आहे आणि रेल्वे कनेक्टिव्हीटीला नवा वेग येणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की या नव्या हायस्पीड रेल्वे योजना पूर्ण झाल्यानंतर देशातील अनेक मोठ्या शहरातील प्रवासात अवघ्या काही तासांत पूर्ण होणार आहे.

भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेन योजनेचे अधिकृत काम साल २०१७ मध्ये झाले होते. ५०८ किलोमीटर लांबीच्या या मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल कॉरिडॉर जपानच्या तंत्रज्ञान आणि आर्थिक सहकार्याने विकसित केला जात आहे.

जपानची प्रसिद्ध शिंकानसेन बुलेट ट्रेन म्हटले जाते. यास भारताच्या हाय स्पीड रेल्वे नेटवर्कचा पाया मानला जातो. सरकारचे म्हणणे आहे की नवीन कॉरिडॉरला मंजूरी दिल्याने देशात वेगवान, सुरक्षित आणि आधुनिक रेल्वे प्रवासाचे नवीन युगाची सुरुवात होणार आहे.

**बुलेट ट्रेनचे हायस्पीड नेटवर्क**

मुंबई-पुणे : ४८ मिनिटे
बेंगलुरु-चेन्नई : १ तास १३ मिनिटे
बेंगलुरु-हैदराबाद : २ तास १० मिनिटे
पुणे-हैदराबाद : २ तास ८ मिनिटे
दिल्ली-लखनऊ : १ तास २ मिनिटे
दिल्ली-वाराणसी : ३ तास १५ मिनिटे
दिल्ली-सिलीगुडी : ६ तास
दिल्ली-वाराणसी-पाटणा कॉरिडोरला मंजूरी दिली.

# पोलादपूर नगरपंचायतीतील वाढीव घरपट्टीसंदर्भात आवश्यक ते प्रयत्न करणार -आमदार अनिकेत तटकरे

**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायत हद्दीतील मालमत्ता करवाढीचा प्रस्ताव सभागृहात मांडल्यानंतर त्या ठरावाला नगरसेवकांच्याच विरोध होण्याची आवश्यकता होती. सुरुवातीला वाढीव घरपट्टीला एकमुखी पाठिंबा आणि नंतर वाढीव घरपट्टीला एकमताने विरोध करण्याच्या दुटप्पी भूमिकेमुळे नागरिकांना दहा पटीने करवाढ सहन करावी लागत आहे. पोलादपूर नगरपंचायत हद्दीतील वाढीव घरपट्टी संदर्भात आमदारकीचा शपथविधी झाल्यानंतर आवश्यक ते प्रयत्न करण्याची ग्वाही कोकण विभागीय स्थानिक स्वराज्य संस्थांचे नवनिर्वाचित बिनविरोध विधानपरिषद सदस्य आ.अनिकेत तटकरे यांनी दिली.

आ.अनिकेत तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष अजित खेडेकर यांच्या



निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाचे अध्यक्ष शैलेश पालकर, सेक्रेटरी सुनील भिलारे, नितीन मधुकर शेठ व अन्य सदस्यांनी आ.अनिकेत तटकरे यांची भेट घेतली.

याप्रसंगी नगरसेवक दिलीप भागवत यांनी मुख्याधिकार्यांनी योग्य भूमिका न घेतल्याने नगरसेवकांची दिशाभूल झाली असून सुरुवातीला वाढीव घरपट्टीचे सर्वच नगरसेवकांनी समर्थन केले आणि जनतेच्या आंदोलनानंतर सर्वच नगरसेवकांनी विरोधात ठराव केल्याची माहिती दिली. यावेळी नगरपंचायत हद्दीतील मालमत्ता करवाढीचा प्रस्ताव सभागृहात मांडल्यानंतर त्या ठरावाला नगरसेवकांच्याच विरोध होण्याची आवश्यकता होती, अशी स्पष्टोक्ती आ.अनिकेत तटकरे यांनी केली.

याप्रसंगी युवा नेते श्रीयश जगताप व जिल्हा प्रवक्ते धनंजय देशमुख, अजय सलागरे, तालुका अध्यक्ष विठोबा पार्टे, सनी विचारे, समीर चिपळूणकर, भाई पाटेकर यांच्यासह नगरसेविका श्रावणी शहा, गरुड, आशा गायकवाड, गणेश घाटे, स्वप्नील भुवड तसेच, दीपक उतेकर, सचिन गायकवाड वकील व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

# तळा तालुक्यात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात अनेक ठिकाणी योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला आहे. तालुक्यात योग दिन कार्यक्रमासाठी अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी तसेच शाळास्तरावर शाळा समिती समित्या , मुख्याध्यापक,शिक्षक, विद्यार्थी,पालक उपस्थित होते.

सकाळी प्रथम योगदिना बद्दल माहिती सांगितली.तदनंतर मार्गदर्शन केले व मुख्य मार्गदर्शक यांनी प्रात्यक्षिके करून घेऊन. सदर प्रसंगी अनेक मान्यवर मार्गदर्शकांनी योगा करणे ही आता काळाची गरज असून योगा केल्याने आपल्याला कोण कोणते फायदे होतात याचे मार्गदर्शन केले.

.यावेळी प्रात्यक्षिकासह योगाचे प्रकार करून घेतले.हे घेत असताना त्यांचा उपयोग हि सांगण्यात आले.यावेळी प्रार्थना,पुरक



हालचाली,वृक्षिसन,पादहस्तासन, अर्धचक्रासन, वज्रासन, कपालभारती इत्यादी योगासने घेण्यात आली.यातून जनजागृतीही करण्यात आली.तालुक्यात शाळा,कॉलेज, इत्यादी ठिकाणी योगदिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला आहे.

# निर्धार नियमित योग करण्याचा, जपा मंत्र निरोगी आरोग्याचा!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल येथे दि. २१ जून २०२६ रोजी १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. यावर्षी आयुष मंत्रालयाने घोषित केलेली “निरोगी वृद्धत्वासाठी योग” ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

आदर्श शैक्षणिक समुहाचे चेअरमन.धनराज विसपुते आणि संचालिका सौ.संगीता विसपुते यांच्या प्रेरणेने आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली



आयोजित या कार्यक्रमात योगाभ्यासाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक व भावनिक स्वास्थ्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

योग प्रशिक्षक अमित चोरघे, सुलताना शेख, . स्मिता आंब्रे व. रुपाली चोरघे यांनी बी.एड. विद्यार्थ्यांना विविध योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा (Meditation) तसेच हिलिंग (Healing) तंत्रांचे महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगितले.

आजच्या धावपळीच्या जीवनात मानसिक तणाव कमी करण्यासाठी, मनःशांती प्राप्त करण्यासाठी, सकारात्मक ऊर्जा वाढविण्यासाठी आणि अंतर्मनाशी संवाद साधण्यासाठी मेडिटेशन व हिलिंग अत्यंत प्रभावी साधने असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध योगासनांचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले.

यावेळी प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांनी आपल्या मनोगतात योग हा केवळ व्यायाम नसून तो एक संपूर्ण जीवनपद्धती असल्याचे सांगितले.

# नवी मुंबईच्या उत्तम डेने फ्रेंडशिप पीक केले सर

**पनवेल : प्रतिनिधी**

नवी मुंबईस्थित गिर्यारोहक आणि निसर्गप्रेमी उत्तम डे यांनी हिमाचल प्रदेशातील फ्रेंडशिप पीक यशस्वीपणे सर केले आहे. हिमालयाच्या पीर पंजाल पर्वतश्रेणीतील ५,२८९ मीटर (१७,३५३ फूट) उंच असलेले, फ्रेंडशिप पीक हे जास्त उंचीच्या पर्वतारोहणासाठी भारतातील सर्वाधिक मागणी असलेले शिखर म्हणून ओळखले जाते.

या मोहिमेस मनालीमध्ये सुरुवात झाली आणि सोलांग व्हॅली, अल्पाइन रान, मोरेन आणि हिमनदी असलेल्या भागामधून पुढे गेली. ९ जून रोजी रात्री ११ वाजता सुरू झालेल्या अंतिम टप्प्यापूर्वी लौहाली, लेडी लेग आणि समिट कॅम्प येथे या मोहिमेचे कॅम्प होते. रात्रभर चढणे अत्यावश्यक होते, कारण खिंडीच्या पलीकडे असलेले भाग खड्डे आणि हिमस्खलन-प्रवण भूभागाचे होते. सूर्याने बर्फ निसरडा होण्यापूर्वी पहाटेच्या वेळी सुरक्षित उतरता आले.

पालकांचा आशीर्वाद आणि भक्कम पाठबळ, देवाची कृपा, शांत वारा, स्वच्छ हवामान आणि मदर माउंटनच्या साक्षीने उत्तमने १० तास चढाई केली आणि १० जून २०२६ रोजी सकाळी ६:०५ वाजता ते शिखरावर पोहोचले. शिखरावर पोहोचल्यानंतर दोनच मिनिटात त्यांनी भारतीय राष्ट्रध्वज फडकावला आणि आनंदाश्रूनी त्यांचे डोळे भरून आले.

"जेव्हा तुम्ही तिच्या कुशीत येता तेव्हा तुम्ही नतमस्तक व्हाल याची खात्री पर्वत करतात. ते नम्रता शिकवतात, तुम्हाला



आठवण करून देतात की स्वतःला किंवा पर्वताला कमी लेखू नका, पाय जमिनीवर भक्कम रोवून राहा आणि पुढे जात राहा," डे आपली प्रतिक्रिया व्यक्त करतात. ते पुढे सांगतात, "माझ्यासारख्या पाच फूट उंचीच्या लोकांना अनेकदा कमी लेखले जाते. हे पर्वत मला बळ देतात.

ते मला सांगतात, 'उत्तम, आयुष्यात स्वतःला कमी लेखू नकोस फक्त चालत राहा.' जेव्हा मी एखादे शिखर सर करतो, तेव्हा मी जगाला संदेश देतोः तुमची उंची कमी असली तरी ठीक आहे. कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी मजबूत आणि मोठी ध्येय गाठण्याची मानसिकता असणे महत्त्वाचे आहे."

पान १ वरुन

# पनवेल मनपा स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मंजुरी

प्रभाग समिती अ व ब क्षेत्रामधील रस्त्यावरील पथदिवे (सिडको हस्तांतरित पथदिवे वगळून) व प्रशासकीय कार्यालये, शाळा, फिश मार्केट, स्मशानभूमी, पाण्याची टाकी, भाजी मार्केट, डॉ. आंबेडकर भवन, आरोग्य केंद्र, रुग्णालये, पादचारी उन्नत मार्ग (एफओबी) व इतर इमारती इत्यादी ठिकाणांच्या विद्युत व्यवस्थेची दोन वर्षांकरिता निगा, देखभाल, दुरूस्ती, सुधारणा व नूतनीकरण करणे कामी वाढीव रकमेस मान्यता मिळण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

प्रभाग समिती अ व ब क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी दोन वर्षांकरिता विद्युत उपकरणे व विद्युत व्यवस्था भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याच्या विषयास समितीने मंजुरी दिली. कामोठे, कळंबोली व खारघर येथील विविध रस्ते दुभाजकांचे सुशोभीकरण करण्याच्या विषयास मंजुरी देण्यात आली तसेच महापालिका क्षेत्रात यांत्रिकी पद्धतीने धुरीकरण व फवारणी सेवा पुरविणेबाबतच्या विषयास यावेळी मंजुरी देण्यात आली.

# पंढरपूर येथे श्री भागवत महापुराण कथा सप्ताह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ गावातील सरपंच पी.डी. भोईर यांच्या वतीने पंढरपुर येथे श्री. भागवत महापुराण कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री विठठ्ल रुख्मीणी मंदिर कुंडेवहाळ यांचे सेवेकरी श्री. पंढरीनाथ भोईर, मथुरा भोईर यांनी अधिकमासाचे औचित्य साधुन श्री क्षेत्र पंढरपुर येथे ह.भ. प. गुरुवर्य भागवत महाराज लोंढे रा. माजलगाव जि. बिड यांच्या प्रेरणेने तसेच वै.ह.भ.प. डाळुराम महाराज व विठाबाई डाळुराम भोईर यांच्या आशिर्वादाने श्री भागवत महापुराण कथा सप्ताहाचे आयोजन श्री क्षेत्र पंढरपुर येथील आगरी धर्मशाळा येथे केले होते. या कार्यक्रमासाठी पनवेल व उरण तालुक्यातील भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी जेष्ठ किर्तनकार मधुाकर महाराज, कुंडेवहाळ यांचे किर्तन तसेच बाळाराम महाराज, दिघोडे, रामनाथ श्रीपत मुंबईकर व त्यांच्या पत्नी जयश्री मुंबईकर, वेश्वी तसेच. चाहु हरी पाटील उपस्थित होते.

सकाळी ५ वाजता काकडा व ९ ते १२ वाजेपर्यत श्री भागवत महापुराण कथा, कथाकार, भागवताचार्य भागवत महाराज लोंढे यांच्या रसाळ वाणीतुन श्री भागवत महापुराण कथा ऐकून श्रोत्यांचे मन तल्लीन होऊन जात असे. सायंकाळी ५ वाजता हरीपाठ, रात्री ७.३० वाजता किर्तन असे. हा कार्यक्रम पार पाडण्याकरीता पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ, ओवळे, दापोली, वेश्वी, नांदगाव येथील महिला मंडळ तसेच बंडुमामा हरिश्चंद्र खुटले, शुभम पाटील, हरिभाऊ कारतुडे, बबन दाभाडे या सप्ताहाचे अन्नदाते शेखर धांडु वास्कर, रामनाथ श्रीपत मुंबईकर, जयश्री रामनाथ मुंबईकर, शरद मुंबईकर आणि साधना मुंबईकर यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

# मालमत्ता कर संकलनाचा १०० कोटींचा टप्पा पार

## पनवेलमध्ये ८३ हजार नागरिकांकडून १०२ कोटींचा मालमत्ता कर भरणा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत मालमत्ता कर संकलनात १०० कोटी रुपयांचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे.



महानगरपालिकेकडून मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांना सातत्याने आवाहन करण्यात येत असून ऑनलाइन तसेच ऑफलाइन पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या आवाहनाला नागरिकांचा सकारात्मक प्रतिसादामुळे आतापर्यंत एकूण ८३हजार ५२ मालमत्ताधारकांनी १०२ कोटी रुपये मालमत्ता कर भरून महानगरपालिकेला सहकार्य केले आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर संकलन मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.पालिकेच्या कर संकलन विभागाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जून महिन्यातच १०० कोटींचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे.

पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार मालमत्ता धारकांसाठी विशेष सवलत जाहीर करण्यात आली आहे. दिनांक ३१ जुलै २०२६ पर्यंत मालमत्ता कर भरल्यास चालू मागणीवर ५% सवलत, तसेच ऑनलाइन पद्धतीने कर भरल्यास अतिरिक्त २% सवलत मिळणार आहे.

या सवलतीचा लाभ घेऊन शहरातील सर्व मालमत्ता धारकांनी वेळेत कर भरण्याचे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

मालमत्ता कराची देयके (बिले) तयार करण्यात आली असून त्यांचे वितरण युद्धपातळीवर सुरू आहे. महानगरपालिकेने नियुक्त केलेले बिल वितरक कर्मचारी कार्यक्षेत्रातील सर्व गृहनिर्माण संस्था, सोसायट्या व संकुलांमध्ये बिल वाटप करत आहेत. संबंधित गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी आवश्यक प्रवेश व सहकार्य करून वितरण मोहिमेला हातभार लावावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी मालमत्ता कराचे बिल ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आले आहे. नागरिकांनी www.panvelmc.org या संकेतस्थळावर किंवा "कर मित्र PMC" मोबाईल अ‍ॅपद्वारे बिल प्राप्त करून ऑनलाइन कर भरण्याची सुविधा वापरावी, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे. आवश्यक असल्यास महानगरपालिका मुख्यालय किंवा संबंधित प्रभाग कार्यालयातूनही बिल उपलब्ध करून घेता येईल.

# भाजप नवीन पनवेल मंडळ प्रभाग क्र.१५च्या वतीने योग दिन साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप नवीन पनवेल मंडळ प्रभाग क्र. १५ च्या वतीने रविवारी (दि.२१) आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

खांदा कॉलनी येथील आगरी शिक्षण संस्थेमध्ये सकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत या विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिसरातील नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी आणि शेकडो नागरिकांनी उपस्थिती राहून सामूहिक योगासने केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने जागतिक स्तरावर साजऱ्या होणाऱ्या योग दिनाचे औचित्य साधून, प्रभागातील नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी भाजप नवीन पनवेल मंडळाच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला.

या कार्यक्रमासाठी तज्ज्ञ योग शिक्षक शिवाजीराव कोरडे, पोपटराव कदम, गणेश खरात आणि प्रसाद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. ह्या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक दिलीप कोरडे (अध्यक्ष - वाहतूक सेल) यांच्या नियोजनाखाली झालेल्या या कार्यक्रमाला खालील लोकप्रतिनिधी आणि पक्षाचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते: दशरथ म्हात्रे (अध्यक्ष, नवीन पनवेल मंडळ तथा नगरसेवक प्रभाग १५) गणेश पाटील (माजी नगराध्यक्ष) कुसुमताई पाटील (नगरसेविका) प्रमिला भोईर (नगरसेविका) .मोतीलाल कोळी उत्तर जिल्हा रायगड आघाडी सरचिटणीस. पंकज लहु घाडी (सरचिटणीस, नवीन पनवेल मंडळ) संजय कांबळे (अध्यक्ष प्रभाग १५) आशा मुंडे (अध्यक्ष महिला मोर्चा) रामनाथ पाटील (अध्यक्ष ओबीसी मोर्चा) सचिन गायकवाड (सरचिटणीस) गोपीनाथ मुंडे (उपाध्यक्ष) दिपक जांभळे (प्रभाग सरचिटणीस) .प्रविण वर्तक (चिटणीस) . जयंत भगत (अध्यक्ष व्यापारी सेल)भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# सीकेटी विद्यालय मराठी माध्यमातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे, चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल येथील मराठी माध्यमाचा आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून रोजीमोठ्या उत्साहात आणि



शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास म्हात्रे, पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर , तसेच विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या हॉलमध्ये एकत्र जमून योगाचे महत्त्व सांगणारी प्रार्थना व भाषण ऐकले. विद्यार्थ्यांना योगाचे फायदे मानसिक आणि शारीरिक आरोग्य यांचे महत्त्व सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी योग प्रशिक्षक अलका आव्हाड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने केली. त्यात सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, त्रिकोणासन, प्राणायम व ध्यान यांचा समावेश होता.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त न्यूईरा हॉस्पिटलमध्ये विशेष सत्र

**पनवेल : वार्ताहर**

आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त वाशीतील न्यूईरा हॉस्पिटलच्या वतीने 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेवर आधारित विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. योगाच्या माध्यमातून शारीरिक हालचाल, मानसिक शांतता आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देत निरोगी आरोग्यासाठी आवश्यक

या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आले.

योग प्रशिक्षिका श्रीमती इला त्रिवेदी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.वाढत्या वयातही नियमित स्ट्रेचिंग, श्वसनाचे व्यायाम आणि माइंडफुलनेससारख्या साध्या सवयी अ‍ॅगीकारल्यास शरीराची बळकटी राखण्यासाठी, तणाव कमी करण्यास आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होते.



# शालेय जीवनात यशस्वी होण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणे गरजेचे -महापौर नितीन पाटील

**पनवेल : वार्ताहर**

शालेय जीवनात यशस्वी होण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी पनवेल शहरातील पनवेल एज्युकेशन सोसायटी पनवेल यांच्यामार्फत आयोजित १०वी व १२वी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमाप्रसंगी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नितीन पाटील, परिमंडळ ३ च्या पोलीस उपायुक्त डॉ.रश्मी नांदेडकर, पनवेल एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन इक्बाल काझी, मा.नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, माजी नगरसेवक मुकीत काझी, जुबेर पटेल, आलम पटेल, जाकीया काझी, असिफ करेल, नाविद पटेल, असीम पटेल, माझ मुल्ला,



शाहनवाज पटेल, जुबेर पिट्टू, जब्बार पटेल, फय्याज दानवे, माजी नगरसेविका जैनाब शेख, सपोनि बजरंग राजपूत यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पनवेल शहर, तळोजा व बारापाडा या ठिकाणी पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या एकूण ३ शाळा असून जवळपास ४ हजार विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. यातील १० वी व १२ वी मध्ये ९०टक्के च्या वर गुण पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यानिमित्ताने संस्थेचे अध्यक्ष इक्बाल काझी यांनी तिन्ही शाळेतून प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीस १ लाख रुपये रोख बक्षिस दिले. तसेच इतर विद्यार्थ्यांना रोख रक्कम, शालेपयोगी वस्तू आदींचे वाटप त्यांच्या खर्चाने करण्यात आले.

यावेळी बोलताना महापौर नितीन पाटील यांनी इक्बाल काझी यांच्या मार्फत होत असलेल्या शिक्षणासाठी सढळ हाताने मदतीचे कौतुक केले. यावेळी महापौर यांनी स्वतःहून शालेय विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी ५० हजाराचा धनादेश दिला.

यानिमित्ताने बोलताना डॉ.रश्मी नांदेडकर यांनी सांगितले की, शिक्षणाचे जीवनात महत्व असून प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे. या संस्थेच्या माध्यमातून अल्प फी घेवून तळागळातील मुलांना शिक्षण दिले जाते हे कौतुकास्पद आहे, यासाठी इक्बाल काझी हे दरवर्षी लाखो रुपयाचा निधी या शाळेसाठी स्वतः खर्च करीत आहेत. आगामी काळात या शाळेतून आपल्या देशाचे राष्ट्रपती डॉ.एम.पी.जे.अब्दुल कलाम हे निर्माण झाले पाहिजे, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

तर संस्थेचे चेअरमन इक्बाल काझी यांनी मुला-मुलींनी शिक्षण घेतलेच पाहिजे. आज सर्वच क्षेत्रात मुली आघाडीवर आहेत हे बघून आनंद होत आहे. या शाळेत सुद्धा टॉपरमध्ये मुलींचेच वर्चस्व आहे. शिक्षणासाठी कोणतीही कमी पडून देणार नाही व या शाळांना चांगल्यात चांगले शिक्षण कसे देता येईल याकडे आपण कायम लक्ष देत असल्याचे त्यांनी सांगितले.

# एमएनएम विद्यालयात चिमुकल्यांच्या हस्ते वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ विज्ञान विद्यालयाच्या पूर्व-प्राथमिक विभागात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात बालवयापासूनच रुजावी आणि निसर्गप्रेमाची भावना विकसित व्हावी याउद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमात पूर्व-प्राथमिक विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारचीरोपे लावून पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. लहानग्यांचा उत्साह, निरागसता आणि वृक्षांप्रती असलेले प्रेमपाहून उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

या प्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. सायली वडवळकर मॅडम, पर्यवेक्षक तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणातील महत्त्व, त्यांचे संवर्धन आणि संगोपन याविषयी मार्गदर्शनकेले. विद्यार्थ्यांनीही लावलेल्या रोपांची नियमित काळजी घेण्याचा संकल्प केला."आजची रोपे म्हणजे उद्याच्या हरित आणि समृद्ध भविष्याची बीजे आहेत," असा संदेश यावेळी देण्यातआला.

चिमुकल्यांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि पर्यावरणप्रेमाचे वातावरण निर्माणझाले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पूर्व-प्राथमिक विभागातील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. पर्यावरणसंवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गाविषयी प्रेम आणि जबाबदारीची भावनानिर्माण करणारा ठरला.

# करंजा येथे मच्छीमार, मत्स्यव्यवसाय अधिकारी आणि पोलिसांची संयुक्त बैठक

**उरण : प्रतिनिधी**

सागरी मासेमारी बंदी नियम पालण करावे यासाठी रायगड जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने करंजा मच्छिमार संस्थेच्या रामचंद्र नाखवा सभागृहात काल सोमवारी मच्छीमार, मत्स्यव्यवसाय विभाग व पोलीस यांची संयुक्त बैठक घेण्यात आली.



दोन महिन्यांच्या बंदी काळात काही मच्छीमार बेकायदा मासेमारी करीत आहेत.उरणच्या समुद्र क्षेत्रात अशा प्रकारची मासेमारी होणार नाही. त्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. प्रोक्सी वॉरपासून सावध राहून समुद्राच्या मार्गाने दहशतवादी हल्ले होण्याची शक्यता आहे. त्यामुळे समुद्र किनाऱ्यावर होणाऱ्या हालचाली वर मासेमारी करणाऱ्या पोलिसांना सहकार्य करावे ही देशभक्ती आहे. त्यामुळे देशाच्या सुरक्षा आणि संरक्षणासाठी सहकार्य करावा.

या पावसाळी मासेमारी बंदी बैठकीसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी,प्रदीप नाखवा,मत्स्य व्यवसाय परवाना अधिकारी सुरेश बागुलगावे,नवी मुंबई सागरी पोलीस ठाणे संतोष काणे यांच्यासह मच्छिमार बांधव उपस्थित होते.

## निवडक

### कुत्र्याच्या मृत्यूप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल :** लहान कुत्र्याला केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी वॉचमन निलेश यादव याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात १९ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. १९ जून रोजी दोघी जणी सोसायटीच्या रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांना जेवण देत असताना सेक्टर ३५ ई, खारघर येथील वोचमेनने कुत्र्याला बांबू फेकून मारला. तो बांबू त्याच्या पायाला लागला. त्यानंतर तो कुत्रा चार चाकी गाडीच्या खाली गेला. त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी निलेश यादव याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**पनवेल :** अज्ञात कारणावरुन एका अज्ञात इसमाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना पनवेल तालुक्यातील वावंजे येथील परशुराम गोंधळी यांच्या शेतात घडली असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.सदर इसमाने गावातील शेतामध्ये आंब्याच्या झाडाला शर्टच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. त्याचे अंदाजे वय ३५ ते ४० वर्षे आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोउपनि वेसेकर येथे संपर्क साधावा.

# पनवेलमध्ये 'साहित्याचा शब्दवेल'तर्फे कविसंमेलन

**पनवेल : वार्ताहर**

कविता फक्त आनंद देण्यासाठीच असावी असे मत सुप्रसिद्ध कवी ए.के.शेख यांनी श्री भगवती साई संस्थान,श्री साई नारायणबाबा आश्रम,पनवेल आणि लायन्स क्लब ऑफ सरगम पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथील साई मंदिरात साहित्याचा शब्दवेल आयोजित निमंत्रित कवी संमेलनात व्यक्त केले.



या कार्यक्रमास साहित्यिक अशोक भांडवलकर,सुधाकर चव्हाण, ज्येष्ठ साहित्यिका जोशना राजपूत,भगवती साई संस्थान,श्री साई नारायणबाबा आश्रम,पनवेलचे सेक्रेटरी रामलाल चौधरी तसेच राम थदानी,लायन्स क्लब ऑफ सरगम पनवेलचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा तसेच संजय गोडसे,ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी,ज्येष्ठ कवी गणेश म्हात्रे आदी उपस्थित होते.

यापुढे बोलताना ए.के.शेख म्हणाले,उत्तम कविता कधी आनंद देते,कधी अंतर्मुख करते,कधी सामाजिक वास्तवावर विचार करायला भाग पाडते तर कधी दुःख,संघर्ष किंवा आशा यांचेही प्रभावी चित्रण करते त्यामुळे कवीने प्रामाणिकपणे आपल्या अनुभवांना आणि भावनांना शब्दरूप द्यावे त्यातून वाचकांपर्यंत भावनिक आणि वैचारिक संवाद पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे.

नवोदित कवींना वाचकांशी नाते जोडण्याची जाणीव करून देते.कविता ही आनंदासह संवेदनशीलता,चिंतन आणि समाजभान जागवणारी असावी,असे सांगून गझल आणि कविता कशी असावी याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी साहित्यिक अशोक भांडवलकर,सुधाकर चव्हाण, जोशना राजपूत,भगवती साई संस्थान,श्री साई नारायणबाबा आश्रम,पनवेलचे सेक्रेटरी रामलाल चौधरी यांची समयोचित भाषणे झाली.

पाऊस,प्रेम,पोवाडा,समाज, पर्यावरण,नातेसंबंध,आई-वडील, निसर्ग आदी विषयांवर कवींनीं आपल्या कविता सादर केल्या. उपस्थित कवींना आयोजकांतर्फे स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. नवोदीत कवींना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजक आणि संस्थांचे मान्यवरांनी कौतुक केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी यांनी केले तर उपस्थितांचे आभार संजय गोडसे यांनी मानले.स्वागत गीत अरुण द. म्हात्रे यांनी गायले. नवीन पिढीला चिमण्या या फक्त पुस्तकामधूनच माहित होतात,या साठी लायन्स पनवेल सरगमतर्फे चिमण्यांच्या संवर्धनासाठी पाहुण्यांना चिमण्यांच्या घरट्यांची भेट म्हणून देण्यात आली.

# सीकेटी कॉलेजमध्ये एमपीएससी परीक्षेच्या पूर्वतयारीचे नियोजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे अर्थशास्त्र विभागा तर्फे शनिवार दिनांक २० जून २०२६ रोजी दु. १२ :०० वाजता "MPSC परीक्षेची पूर्व तयारी" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख आणि मानवता विद्याशाखा प्रमुख प्रो.डॉ. बी .एस. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. मा. शहाजी भोसले (लेखा व वित्त अधिकारी) रायगड जिल्हा परिषद यांनी अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना "MPSC परीक्षेची पूर्व तयारी" या विषयावर मार्गदर्शन केले.

"MPSC परीक्षेची पूर्वतयारी" या कार्यक्रम मध्ये सध्या विद्यार्थ्यांना MPSC चा अभ्यास करताना येणाऱ्या अडचनी, आव्हाने आणि त्यावरील उपाय या वेगवेगळ्या मुद्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागाच्या एकूण ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## संपादकीय

# नियोजन आणि सज्जता

दक्षिण कोकण आणि महाराष्ट्राच्या अन्य काही भागांत सोमवारपासून मान्सून सक्रिय होण्यासाठी अनुकूल परिस्थिती असल्याचे सांगण्यात आले. मान्सूनच्या आगमनाने राज्यातील काही भागांना दिलासाही मिळाला आहे. पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक गरजा यांसाठी जलसाठा अत्यंत महत्त्वाचा असल्याने सरकारकडून आधीपासूनच उपलब्ध साठ्याचे योग्य ते नियोजन सुरू झाले आहे.

**एल निनोचा प्रभाव आणि कमी दाबाच्या क्षेत्रांचा अभाव आदी घटकांच्या एकत्रित परिणामामुळे यंदा देशभरातच मान्सूनची वाटचाल संथ झाली आहे. परंतु आता मान्सूनची रेषा अलिबाग, पुणे, निझामाबाद, दांतेवाडा, बलंगीर, गया आणि मुझफ्फरपूरपर्यंत पोहोचल्याचे सोमवारी हवामान खात्याकडून जाहीर करण्यात आले. राज्यात धुळे, कोपरगाव, शिर्डी आदी भागांत सोमवारी पावसाने जोरदार हजेरी लावली. रविवारी आणि सोमवारी सकाळी मुंबई शहर, उपनगरे आणि ठाणे परिसरात मान्सूनपूर्व पावसाच्या सरी बरसल्याने पावसासाठी यंदा जूनच्या अखेरच्या आठवड्यापर्यंत ताटकळलेल्या मुंबईकरांनाही मान्सूनच्या आगमनाची वर्दी मिळाली आहे. अर्थात रिमझिम बरसून पावसाने पुन्हा दडी मारल्याने मुंबई व आसपास उकाडा कायम आहे. मात्र २४ ते २८ जून दरम्यान हवामान प्रणाली हळूहळू राज्याच्या अंतर्गत भागांकडे सरकणार असल्याचे हवामान विभागाने जाहीर केल्याने सगळ्यांनीच सुटकेचा निःश्वास सोडला आहे. मान्सूनच्या लांबलेल्या आगमनामुळे राज्यातील धरणांमधील पाणीसाठा खाली घसरल्याने राज्य सरकारने उपलब्ध पाणी ३१ ऑगस्टपर्यंत केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे तसेच शेतीसाठीचा पाण्याचा विसर्ग बंद करण्याचे आदेश दिले आहेत. देशाच्या हवामान विभागाने यंदा एल निनोचा प्रभाव राहण्याची शक्यता व्यक्त केली असून पर्जन्यमानात घट होण्याचा अंदाज वर्तवला आहे. ही शक्यता लक्षात घेऊन भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून राज्यातील सरकारने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबत तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्याचे आदेश दिले आहेत. धरणे, कालवे, नद्या, तलाव आणि इतर जलस्त्रोतांमधून होणारा अनधिकृत पाणीउपसा रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. महसूल, पोलिस आणि जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत नियमित तपासणी करून अनधिकृत मोटारी, पाईपलाइन, पंप आणि इतर साधनसामग्रीवर कठोर कारवाई केली जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, पाणीपुरवठा विभाग आणि जलसंपदा विभाग यांच्यात समन्वय ठेवून परिस्थितीचा सातत्याने आढावा घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. राज्यातील कोणत्याही नागरिकाला पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी यंत्रणांनी दक्षता घेऊन सरकारच्या निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करावी असे सरकारने स्पष्ट केले आहे. जलयुक्त शिवारसारख्या योजनांच्या माध्यमातून जलसंधारणावर सातत्याने भर देण्यात आला आहे. नाले खोलीकरण, गाळ काढणे, जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन आणि स्थानिक पातळीवरील जलव्यवस्थापनामुळे पावसाचे पाणी अडविण्याची क्षमता वाढली आहे. परिणामी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात वाहून जाण्याऐवजी जमिनीत मुरत असून जलसाठ्यांमध्येही वाढ होणे अपेक्षित आहे. मुंबई, ठाणे, पुणे आणि अन्य शहरी भागांमध्ये पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, रस्त्यांची दुरुस्ती आणि जलनिस्सारण व्यवस्थेच्या सुधारणांवर भर देण्यात आला आहे. हवामान विभागाशी सातत्याने समन्वय ठेवून नागरिकांना अचूक आणि वेळेवर माहिती पुरविण्याचे कामही प्रभावीपणे सुरू आहे. मान्सूनच्या आगमनापूर्वी प्रशासनाने सर्वच बाबतीत सज्जता ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. पूरप्रवण जिल्ह्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नियंत्रण कक्षांची स्थापना, धरण व्यवस्थापनासाठी विशेष निर्देश यामुळे संभाव्य संकटांना तोंड देण्याची क्षमता वाढली आहे.**

# तहानलेल्या धरतीची हाक : येरे येरे पावसा!



जून महिना उजाडला की मन आपसूकच आभाळाकडे ओढ घेऊ लागतं. वैशाख–ज्येष्ठाच्या रखरखत्या उन्हाने तापलेली धरती, झाडांची निष्पर्ण झालेली फांदी आणि कोरड्या पडलेल्या विहिरी पाहिल्या की जीवाची घालमेल होते. फॅनचा आवाजही उष्ण वाटतो, कुलरची हवाही पुरत नाही. अशा वेळी डोळे फक्त एकच गोष्ट शोधतात, काळे ढग. पावसाची प्रतीक्षा ही कॅलेंडरवरच्या तारखेची नसते. ती श्वासागणिक वाढणारी एक हुरहूर असते. शेताच्या बांधावर उभा असलेला शेतकरी मातीचा ढेकूळ हातात घेऊन चुरगळतो आणि आकाशाकडे पाहतो. त्याच्या डोळ्यातली ती आस शब्दांपलीकडची असते. कारण त्याला माहीत असतं, पाऊस म्हणजे फक्त पाणी नाही. पाऊस म्हणजे पुढच्या वर्षाची भाकर, मुलांच्या शाळेची फी, आणि घरातल्या माणसांची स्वप्नं. शहरातल्या दहाव्या मजल्यावर राहणारा माणूसही तितक्याच आतुरतेने वाट पाहत असतो.

त्याला शेती करायची नसते, पण महिनाभराच्या उकाड्याने हैराण झालेल्या जीवाला पहिल्या सरीचा गारवा हवा असतो. खिडकीबाहेरच्या झाडावर एकही पक्षी दिसत नाही तेव्हा जाणवतं की सृष्टीदेखील पावसाची वाट पाहतेय. पावसाच्या आधीचा काळ सगळ्यात अस्वस्थ करणारा असतो. हवा जागच्या जागी थांबते. झाडाचं पानसुद्धा हलत नाही. रात्री अंगणात झोपताना घामाने चिंब भिजायला होतं. अशा वेळी लांबून कुठूनतरी मोराचा आवाज आला किंवा विजा चमकू लागल्या की काळजात एकदम चमकून जातं. हवामान खात्याचा अंदाज, न्यूज चॅनलची ब्रेकिंग न्यूज आणि मोबाईलमधलं वेदर ॲप हे सगळं दिवसातून दहावेळा तपासलं जातं. 'बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला' ही बातमी ऐकली की उगाचच हायसं वाटतं. कारण ही प्रतीक्षा सामूहिक असते. एकाच वेळी करोडो जीव आभाळाकडे डोळे लावून बसलेले असतात. शेतकरी, विद्यार्थी, नोकरदार, गृहिणी, वृद्ध, लहान मुलं, सगळ्यांचीच एकच तहान असते.आणि मग अचानक एक दिवस तो क्षण येतो. वाऱ्याची दिशा बदलते.

एक गार झुळूक अंगावरून जाते. धुळीचा भोवरा रस्त्यावर नाचू लागतो. आभाळात काळे–निळे ढग दाटून येतात. सूर्य कुठल्या कुठे लपून बसतो. काजळी धरल्यासारखा अंधार दाटतो. विजेचा लखलखाट होतो आणि ढगांचा गडगडाट सुरू होतो. आणि टप... पहिला थेंब पत्र्यावर पडतो. त्या आवाजाची सर कशालाच नाही. तो आवाज कानात नाही तर थेट काळजात उतरतो. मग एकाचे दोन, दोनाचे चार होत सरीवर सरी कोसळू लागतात. मातीचा एक अनामिक गंध आसमंतात पसरतो. शास्त्रज्ञ त्याला 'पेट्रिकॉर' म्हणतात, पण आपल्यासाठी तो 'पहिल्या पावसाचा वास' असतो. तो वास नाकात शिरताच लहानपणी चिंब भिजल्याच्या, कागदाच्या होड्या सोडल्याच्या, आणि शाळा बुडवल्याच्या आठवणी ताज्या होतात. पाऊस सुरू झाला की माणूस आपोआप बदलतो. घरात बसलेली माणसं गॅलरीत येतात. हात बाहेर काढून थेंब झेलतात. कोणीतरी नकळत अंगणात उतरतं आणि चिंब भिजतं. कपडे ओले होतात, केसांमधून पाणी निथळतं, पण कोणी तक्रार करत नाही. कारण हा पाऊस तनाला नाही, मनाला भिजवतो. महिन्यांची मरगळ, उन्हाची चिडचिड, आणि मनातली उदासी सगळं धुऊन निघतं.

मुलं कागदाच्या होड्या करून गटारात सोडतात. त्यांच्या होड्यांबरोबर त्यांची स्वप्नंही तरंगत जातात. कॉलेजची मुलं बाईक काढून लाँग ड्राईव्हला जातात. वृद्ध माणसं खुर्ची टाकून व्हरांड्यात बसतात आणि नातवंडांना जुन्या पावसाच्या गोष्टी सांगतात. चहाच्या टपरीवर एक वेगळीच मैफल जमते. वाफाळता चहा, कांदा भजी आणि बाहेर कोसळणाऱ्या सरी, यापरत सुख ते काय असतं. गावात तर पावसाचं रूपच न्यारं असतं. पहिल्या सरीबरोबर शेतकरी रानाकडे धाव घेतो. त्याच्या पायाला चिखल लागतो, अंगावर शिडकावा उडतो, पण त्याच्या चेहऱ्यावर जो आनंद असतो तो कुठल्याही श्रीमंतीत विकत मिळणार नाही. बैलांना नांगर जुंपला जातो, बियाण्याची पिशवी खांद्यावर येते. 'पेरते व्हा' ही हाळी आभाळाला भिडते. विहिरींची पातळी वाढू लागते, ओढ्यांना आवाज फुटतो आणि घरातली चूल पुन्हा आनंदाने धडधडू लागते. शेतात हिरवे कोंब डोकावू लागतात तेव्हा शेतकऱ्याला जग जिंकल्यासारखं वाटतं. कारण तो कोंब फक्त धान्याचा नसतो, तो आशेचा असतो.पाऊस पडून गेल्यावर सृष्टीचा कायापालट होतो. झाडं धुऊन निघाल्यासारखी तजेलदार दिसतात. डोंगर हिरवी शाल पांघरतात. धबधबे खळखळून वाहू लागतात. नदी–नाले दुथडी भरून वाहतात. रानात तेरड्याची, सोनकीची फुलं फुलतात.

रात्री काजवे लुकलुकतात आणि बेडकांची मैफल रंगते. हवेतला गारवा मनापर्यंत पोहोचतो. डोक्यातले विचार निवळतात. एक नवी ऊर्जा संचारते. शेतात काम करणाऱ्याला, ऑफिसात फाईल हाताळणाऱ्याला आणि घरात अभ्यास करणाऱ्या मुलाला, सगळ्यांनाच पावसामुळे नवं बळ मिळतं. पावसाची प्रतीक्षा आपल्याला खूप काही शिकवून जाते. पहिली गोष्ट म्हणजे संयम. आपण बटण दाबून लाईट लावू शकतो, एसी लावून गारवा मिळवू शकतो, पण पावसाचं बटण आपल्या हातात नसतं. निसर्गापुढे आपण किती क्षुद्र आहोत याची जाणीव पावसाची वाट पाहतानाच होते. दुसरी गोष्ट म्हणजे कृतज्ञता. पाणी नळातून येतं, पण नळात ते आणणारा पाऊस असतो. एक–एक थेंब जपून वापरावा वाटतो. जे सहज मिळतं त्याची किंमत कळत नाही, पण जे प्रतीक्षेनंतर मिळतं त्याचा एक थेंबही वाया घालवावासा वाटत नाही. आणि तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जोडलेपण. पाऊस पडतो तेव्हा गरीब–श्रीमंत, लहान–मोठा हा भेद गळून पडतो. सगळे एकाच आभाळाखाली भिजतात. एकाच मातीचा गंध घेतात. एकाच चहाचा आस्वाद घेतात. पाऊस माणसाला माणसाशी आणि मातीशी पुन्हा जोडतो.

कवीला कविता सुचते, चित्रकाराला रंग सापडतात आणि सामान्य माणसाला जगण्याचं कारण सापडतं. 'येरे येरे पावसा' हे बालगीत असो किंवा 'रिमझिम गिरे सावन' ही गझल असो, पावसाने प्रत्येकाच्या मनाला स्पर्श केला आहे. संत साहित्यातदेखील पावसाचे दाखले येतात. कारण पाऊस म्हणजे केवळ हवामान नाही. तो एक भाव आहे. तो एक विश्वास आहे. उन्हाळा कितीही कडक असला तरी त्यानंतर पाऊस येणारच हे निसर्गाचं जणू काही आश्वासनच आहे. म्हणूनच दरवर्षी उन्हाळा संपता संपता आपण पुन्हा तीच प्रतीक्षा करतो. कारण आपल्याला माहीत असतं, काळ्या ढगांच्या मागून येणारा तो पाऊस फक्त पाणी घेऊन येत नाही. तो सोबत समृद्धी घेऊन येतो, समाधान घेऊन येतो आणि उद्याची उमेद घेऊन येतो. पावसाचा पहिला थेंब धरतीवर पडतो तेव्हा तो फक्त जमीन भिजवत नाही, तर करोडो मनांवरची मरगळही धुवून काढतो. हीच प्रतीक्षा आपल्याला जिवंत ठेवते. हीच ओढ आपल्याला पुढे नेते. पाऊस येईल या एका आशेवर आपण ऊन सोसतो आणि जेव्हा तो येतो तेव्हा कळतं की प्रतीक्षा सार्थकी लागली.

(साभार इंटरनेट)




## काय आहे 'जीमेल अनसब्सक्राइब स्कॅम'?

ऑनलाईन फसवणुकीच्या घटना गेल्या काही दिवसात प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. फसवणूक करणारे आरोपी वेगवेगळे मार्ग शोधून नागरिकांना गंडा घालताना दिसत आहेत. आपल्यापैकी बऱ्याच जणांना ई–मेलवर अनेक प्रकारचे प्रोमोशनल ईमेल, खोट्या जॉब ऑफर्स आणि फीडबॅक रिक्वेस्ट पाठवल्या जात असतील. यामुळे तुमचा जीमेल स्टोरेज भरू लागते आणि यापासून सुटका करून घेण्यासाठी आपण ई–मेल 'अनसब्सक्राइब बटण'ची मदत घेतो. तुम्ही देखील असेच काही करत असाल तर तुम्हाला वेळीच सावध होण्याची आवश्यकता आहे, कारण फसवणूक करणारे आता या अनसब्सक्राइब बटणचाच उपयोग फसवण्यासाठी करत आहेत.




'द वॉल स्ट्रीट जर्नल'च्या रिपोर्टनुसार ई–मेलमध्ये आपल्याला जो अनसब्सक्राइब लिंक दिसते ती नेहमीच खरी नसते. बऱ्याचदा फसवणूक करणारे तुम्हाला अशी लिंक पाठवून ई–मेल ॲक्टिव आहे की नाही हे तपासतात. एकदा का तुम्ही अनसब्सक्राइब लिंकवर टॅप केलं की फसवणूक करणाऱ्यांना लक्षात येते की हा ईमेल ॲक्टिव आहे, त्यानंतर हे आरोपी पुढील पावले टाकू लागतात.

द वॉल स्ट्रीट जर्नलच्या रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे की अनोळखी सेंडरकडून पाठवण्यात आलेल्या ईमेलमध्ये अनसब्सक्राइब लिंक असेल, तर त्यावर चुकूनही क्लिक करू नका. असे केल्याने तुमचा फोन, लॅपटॉप किंवा ज्या डिव्हाईसवरून तुम्ही क्लिक केले आहे त्याचा एक्सेस फसवणूक करणाऱ्याकडे जाऊ शकतो. याशिवाय तुमची खाजगी माहिती देखील चोरी केली जाऊ शकते.

**अशी घ्या काळजी**

* अनोळखी सेंडरकडून येणाऱ्या ई–मेलवर क्लिक करण्याएवजी त्या ई–मेलला स्पॅम असे मार्क करा, ज्यामुळे जीमेल पुढच्या वेळी तुम्हाला असे ई–मेल येण्यापासून वाचवेल.

* तुम्हाला जर पाठवणाऱ्यावर विश्वास नसेल, तर ई–मेलमध्ये दिसत असलेल्या अनसब्सक्राइब लिंकवर क्लिक करण्याची चूक करू नका.

* हाईड माय ई–मेलसारख्या प्रायव्हसी टूल्सचा वापर करा, हे टूल तुमच्या खरा ई–मेल अड्रेस लपवून ठेवण्याचे काम करेल.

* ई–मेल ॲप आणि ॲंटीव्हायरस सॉफ्टवेयर हे कायम अपडेट करत राहा, यामुळे अशा धोक्यांपासून संरक्षण होईल.

# भारतीय जनसंघाचे संस्थापक श्यामा प्रसाद मुखर्जी



### निमित्त

थोर राष्ट्रीय नेते, भारतीय जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष व शिक्षणतज्ञ अशी श्यामा प्रसाद मुखर्जी यांची ओळख राहिली आहे. आज त्यांचा पुण्यस्मरण दिन. त्यांचा जन्म ६ जुलै १९०१ जून रोजी कलकत्त्यात (आताचे कोलकाता) प्रसिद्ध मुखर्जी घराण्यात झाला. त्यांचे वडील आशुतोष मुखर्जी विख्यात न्यायाधीश व पुढे कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू, तर त्यांच्या आईचे नाव जोगमायादेवी.

श्यामा प्रसाद कलकत्ता विद्यापीठातून बीए झाले (१९२१). विद्यार्थीदशेतच त्यांचा विवाह सुधादेवी या मुलीशी झाला (१९२२). त्यांना दोन मुले व दोन मुली झाल्या. विद्यापीठाच्या सीनेटवर त्यांची निवड झाली. त्यानंतर त्यांनी बीएल (१९२४) ही पदवी घेऊन इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास केला व ते बॅरिस्टर झाले (१९२७). लंडनहून परत आल्यावर त्यांनी वकिली सुरू केली. ते बंगाल कायदेमंडळावर निवडून आले (१९२९), पण वर्षभराने गांधीजींच्या देशव्यापी कायदेभंग आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी त्यांनी कायदेमंडळाचा राजीनामा दिला. या वेळी काँग्रेसच्या एकूण धोरणाविषयी ते नाराज होते. परिणामतः ते हिंदू महासभेकडे वळले.

पुढे श्यामा प्रसाद कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू झाले (१९३४). त्याच वर्षी त्यांच्या पत्नी सुधादेवी निवर्तल्या. त्यानंतर अखेरपर्यंत त्यांनी दुसरा विवाह केला नाही. हिंदू महासभेतर्फे ते १९३७मध्ये बंगालच्या कायदेमंडळावर पुन्हा निवडून आले. मुस्लिम लीगच्या १९४०च्या लाहोर ठरावानंतर त्यांनी फाळणीविरूद्ध देशभर प्रचार केला. त्या आधी काही काळ ते हिंदू महासभेचे हंगामी अध्यक्षही होते. लीग मंत्रिमंडळाच्या पराभवानंतर ते बंगालच्या फझलुल हक मंत्रिमंडळात दाखल झाले, पण भारत छोडो आंदोलनाच्या वेळी त्यांनी गांधीजी व इतर काँग्रेस नेत्यांची सुटका आणि संभाव्य जपानी आक्रमणाला तोंड देण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या स्थापनेची मागणी केली. या प्रश्नांवर तड लावण्यासाठी नंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

१९४३मध्ये बंगालचा दुष्काळ निवारण्यासाठी श्यामा प्रसादांनी खूप कष्ट घेतले. १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरु यांच्या पहिल्या केंद्रीय मंत्रिमंडळात ते उद्योग आणि पुरवठामंत्री झाले. त्या आधीच हिंदू महासभेमध्ये अहिंदूनांही प्रवेश द्यावा या मुद्यावर त्यांनी त्या पक्षाचा राजीनामा दिला होता. मंत्री म्हणून त्यांनी फार अल्प काळ काम केले. नेहरू–लिकायत अलीखान कराराच्या निषेधार्थ त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला (१९५०). तथापि, त्यांच्या कारकीर्दीत चित्तरंजन चलनशील यंत्र कारखाना व सिंद्री खत कारखाना हे दोन भव्य प्रकल्प त्यांच्या प्रयत्नांनी सुरू होऊन भारताच्या औद्योगिक विकासात मोलाची भर पडली.

काँग्रेसला शह देण्यासाठी श्यामा प्रसाद यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली (१९५१). १९५२च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ते जनसंघातर्फे लोकसभेवर निवडून आले. संसदेत त्यांनी विरोधी पक्षांची एक राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन केली. जम्मू व काश्मीरच्या संपूर्ण विलीनीकरणासाठी त्यांनी अभियान सुरू केले. या आंदोलनानिमित्त प्रत्यक्ष काश्मीरमध्ये जाऊन प्रचार करण्याचा त्यांनी निश्चय केला. जम्मू–काश्मीरचे तत्कालीन मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला यांच्या शासनाने त्यांच्या राज्यप्रवेशावर बंदी घातली. बंदी मोडून जम्मू–काश्मीरमध्ये प्रवेश केल्यावर त्यांना अटक झाली. तुरुंगवासातच त्यांचा २३ जून १९५३ रोजी मृत्यू झाला. (साभार विकासपीडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# दुधीची साल फेकून देता? मग थांबा!

दुधीची भाजी सगळ्यांनाच आवडते असं नाही. काही जण भाजी पाहिल्यानंतरच खाण्यास नकार देतात, पण जर दुधीचा हलवा बनवला, तर मात्र ते अगदी आवडीने खातात, पण ही भाजी एकंदरीतच आरोग्यदृष्ट्या भरपूर फायदेशीर असते. ती भाजी खरेदी करताना कोणत्या गोष्टी बघून घेतल्या पाहिजेत तसेच भाजी बनविताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत याबद्दल जाणून घेऊ...



मुंबईतील पी.डी. हिंदुजा हॉस्पिटलच्या क्लिनिकल डाएटिशियन चैताली राणे यांनी सांगितले की, दुधीमध्ये पाण्याचे प्रमाण सर्वाधिक असते, जे हायड्रेशन आणि भूक नियंत्रित करण्यास मदत करू शकते. त्यात फायटोकेमिकल्स आणि दाहकविरोधी गुणधर्म असतात, जे शरीरात निर्माण होणारा ताण कमी करण्यास मदत करतात. ही कृती हृदयाचे आरोग्य राखण्यास मदत करते. त्यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब व हृदयरोग असलेल्या व्यक्तींसाठी दुधीची भाजी खाणे भरपूर फायदेशीर ठरू शकते.

दुधीची भाजी पोटॅशियम, लोह, कॅल्शियम आणि जीवनसत्त्वे बी कॉम्प्लेक्स व सीसारख्या आवश्यक पोषक घटकांचा समृद्ध स्रोत आहे. कमी चरबीयुक्त पदार्थ आणि उच्च आहारातील तंतुमय गुणधर्मासह दुधी हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे, कारण दुधी रक्तदाब नियंत्रित करते आणि ताण व कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करते. त्याचबरोबर अपचन, अल्सर, तणाव आणि नैराश्याला प्रतिबंधित आणि नियंत्रित करण्यास मदत करते, कारण ते शरीरात मुक्त आम्ल रॅडिकल्सची निर्मिती कमी करतात; ज्यामुळे इन्सुलिन संवेदनशीलता व्यवस्थापित करण्यास मदत होते.

भाजी खाल्यानंतर हे सगळे आरोग्य फायदे तुम्हाला तेव्हाच मिळतील जेव्हा तुम्ही भेसळमुक्त दुधी खरेदी कराल. जिंदाल नेचरक्योर इन्स्टिट्यूटच्या मुख्य आहारतज्ज्ञ सुषमा पी. एस. यांनी रसायनमुक्त, भेसळमुक्त दुधी ओळखण्याचे सोपे मार्ग सांगितले. मार्केटमधून दुधी खरेदी करताना तो आकारापेक्षा मोठा, ज्याचा रंग हलका हिरवा असेल आणि त्याची पोत कडक असेल असाच दुधी निवडा. ज्या भोपळ्यावर ओरखडे, हलके डाग आहेत, असा दुधी खरेदी करू नका. ताज्या दुधीचा सुगंध मातीसारखा आणि सौम्य असतो. दुधी खरेदी करताना विचित्र किंवा तीव्र रसायनाचा वास येत असेल, तर तो अजिबात खरेदी करू नका. सेंद्रिय शेती पद्धतींना पाठिंबा दिल्याने शाश्वत आणि आरोग्यदायी अन्न वापरण्यासदेखील प्रोत्साहन मिळते.

# अनधिकृत पुतळ्यांना चाप!

## रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अलिबाग : प्रतिनिधी**

सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत पुतळे उभारणे बेकायदेशीर आहे. त्यावर नियंत्रण ठेवले नाही तर नंतर पुतळा काढताना कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा कार्यक्षेत्राच्या हद्दीत अनधिकृत, बेकायदेशीर पुतळा स्थापनेपूर्वीच्या प्रतिबंधक उपाययोजना तसेच असा पुतळा स्थापन झाल्यास करावयाची कायदेशीर कार्यवाही आणि कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती सांभाळण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम (१) (फ) अन्वये जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मार्गदर्शक सूचना व प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील तरतुदीनुसार मार्गदर्शक सूचना व प्रतिबंधात्मक आदेश जारी करणे आवश्यक आहे. या आदेशानुसार महसूल विभाग, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्था ज्या ठिकाणी अनधिकृत पुतळा स्थापन होणार आहे, अशा शासकीय भूभागाच्या मालकी व देखरेखीच्या दृष्टीने प्राथमिक जबाबदार प्राधिकरणे मानली जातील. त्यांच्या कार्यक्षेत्रात पुतळा स्थापनेशी संबंधित कोणतीही हालचाल किंवा पूर्वतयारी, जसे की चबुतरा बांधकाम, साहित्य साठवण किंवा जागेवर काम सुरू होणे असे आढळून आल्यास संबंधितांनी तत्काळ प्रतिबंधात्मक कारवाई करावी, तसेच पोलिसांना कळवावे.

ज्या खात्याच्या/प्राधिकरणाच्या जागेत अनधिकृत पुतळा उभारला जाईल, त्यांनीच पोलिसांकडे एफआयआर देण्याबाबत आग्रही राहावे. अनधिकृत पुतळा बसू नये यासाठी संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर खबरदारी घ्यावी. कोणत्याही प्रकरणात संबंधित प्राधिकरणांनी माहिती असूनही कारवाई न करणे किंवा प्रशासकीय निष्क्रियता दाखविणे ही बाब कर्तव्य बजावण्यात दिरंगाई म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. अशा परिस्थितीत समितीने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. जिल्हास्तरावर तीन महिन्यांतून एकदा व उपविभागीय स्तरावर दर महिन्याला एकदा बैठक घेण्यात यावी.

या बैठकीत प्रलंबित किंवा संशयास्पद बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात यावा. संबंधित प्राधिकरणांनी त्यांच्या तालुका स्तरावरील सर्व प्राधिकरणांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रात नियमित निरीक्षण करून अनधिकृत पुतळ्यांचे बांधकाम किंवा पूर्वतयारी चालू असल्यास त्वरित थांबविण्याची जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३४ अन्वये गावाच्या कारभारासंबंधात नियुक्त केलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याने आणि गावात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने कलम ३४ (१) (च) अन्वये सुव्यवस्था राखणे किंवा गुन्हेगारीस प्रतिबंध करणे यांना बाधक होण्याचा संभव असलेल्या बाबींसंबंधी कुठलीही माहिती जवळच्या दंडाधिकारी किंवा पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी यांना कळविणे बंधनकारक आहे.

# खालापुरात दुचाकी अपघात वाढले

## महिनाभरात सहा जणांनी गमावला जीव

**खोपोली : प्रतिनिधी**

रस्ते अपघातात मागील महिनाभरात खालापूर, खोपोली, रसायनी हद्दीत सहा दुचाकी चालकांचा मृत्यू झाला असून विशेष म्हणजे मृत्यू झालेले १९ ते ३२ वयोगटातील आहेत. सोमवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास नारायण बबन हिंदोळा (३२) आणि हरी लक्ष्मण काष्टे (३०, दोघे रा. खांबेवाडी खालापूर) हे दुचाकीवरून पालीकडून खोपोलीकडे येताना कारगावनजीक अज्ञात वाहनाने धडक दिल्याने गंभीर जखमी झाले. नारायणचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला तर हरी गंभीर जखमी



असून एमजीएम रुग्णालय कळंबोली येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमवारी रात्री पाली-खोपोली राज्यमार्गावर एक बळी




गेला. याअगोदर जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर दांड फाटा नजीक मोठे लोखंडी पाईप साईडपट्टी नजीक ठेवल्याने त्याला धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला होता. पळसदरी मार्गावरदेखील अपघातात दोघांना जीव गमवावा लागला होता.

# तळा तालुक्यात पावसाचे आगमन; शेतकरी सुखावला, पेरणीला वेग

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले होते. अखेर रविवारी रात्री व सोमवारी सकाळी पावसाने हजेरी लावल्याने बळीराजा सुखावल्याचे चित्र पाहावयास मिळाले. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण होऊन नागरिकांना उकाड्यापासून सुटका मिळाली आहे. दिवसभर आकाशात ढगाळ वातावरण असून काही भागात रिमझिम पाऊस पडत आहे.

पावसाच्या आगमनाने शेतकरी आता शेतीच्या कामात मग्न झाला असून पेरणीला सुरुवात केली आहे. मागील वर्षी या कालावधीत भातशेतीच्या लावणीला सुरुवात झाली होती. यावर्षी मात्र लांबलेल्या पावसामुळे आता पेरणीला सुरुवात झाली आहे. या लांबलेल्या पावसामुळे शेतकरी व नागरिकांना पाणी समस्या, पेरणी अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तसेच हा पाऊस पडेल किती दिवस राहील याबाबतही शेतकरी



वर्गातून चिंता व्यक्त केली जात आहे.

यापुढे चांगला पाऊस पडो, अशी निसर्गाकडे शेतकरीवर्ग याचना करत आहे. तळा तालुक्यात पावसाची शक्यता कायम असून हवामान खात्याने अनुकूल परिस्थिती दर्शविली आहे.

# सभापती कलावती पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पेणमध्ये वृक्षारोपण आणि रस्ता कामाचे भूमिपूजन

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती कलावती पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पेण शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील गणपती विसर्जन घाट परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर नंदिमाळ नाका ते विश्वेश्वर मंदिर या भागातील काँक्रिटीकरण रस्त्याचे भूमिपूजनही याच दिवशी करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष प्रितम पाटील, उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, नगरसेविका आफ्रिन अखवारे, वैशाली कडू यांच्यासह पेण पालिकेचे सर्व सभापती, नगरसेवक, नगरसेविका, शहरातील हितचिंतक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना नगराध्यक्ष प्रितम



पाटील यांनी सांगितले की, पर्यावरणाचा समतोल राखून आपली जबाबदारी लक्षात घेता सभापती कलावती पाटील यांनी जे पाऊल उचलले आहे ते कौतुकास्पद आहे. सध्याचे वातावरणातील चित्र लक्षात घेता लांबणीवर गेलेला पाऊस पाहता झाडे लावणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे वाढदिवसाचे औचित्य साधून कलावती पाटील यांनी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले.

ज्या ठिकाणी नेहमी वर्दळ असते आणि त्याच ठिकाणी गणपती बाप्पाचे विसर्जन घाट आहे, अशा नदीकिनारी झाडे लावणे काळाची गरज आहे. हे लक्षात घेऊन कलावती पाटील यांनी येथे वृक्षारोपणाचा योग्य निर्णय घेतला. यावेळी सभापती कलावती पाटील यांनी इतर विकासकामे करताना पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज असून त्याला प्राधान्य दिले आहे. प्रभागातील सर्वसमावेशक कामे करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असणार असल्याचे सांगितले.

नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी कलावती पाटील यांनी पर्यावरणाबाबत जबाबदारी लक्षात घेऊन पुढाकार घेतला त्याचे आम्ही स्वागत करतो. पेण प्रायव्हेट हायस्कूल येथे शिक्षिका, मुख्याध्यापिका म्हणून विद्यार्थी घडवले. आता नगरसेविका म्हणून प्रभागाचा विकास करण्यात मोलाचा हातभार लावत आहेत, याचा आम्हाला अभिमान असल्याचे सांगितले.

# आयुक्त वैभव ढेरे यांच्याकडून शैक्षणिक साहित्य वाटप

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा आपटवणे येथे नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना आनंदाचा अनोखा अनुभव मिळाला. शाळा सुरू होताच सोलापूरचे आयुक्त वैभव ढेरे यांनी आपल्या आई वडिलांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी सकाळी १० वाजता विद्यार्थी उत्साहात शाळेत दाखल झाले होते. यावेळी आयुक्त वैभव ढेरे यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांना



### आई वडिलांच्या स्मरणार्थ उपक्रम

वह्या, पाण्याच्या बाटल्या, स्केच पेन, रंगीत खडू, बॅट, चेंडू आदी साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थी तसेच पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष नेहा ढिसे, उपाध्यक्षा मयुरी दंत, विशाल उतेकर, पांडुरंग निरगुडा, प्रकाश राठोड, चंद्रकांत दरवडे, संगीता लेंडे व मनस्वी दंत उपस्थित होते. यावेळी शाळेचे शिक्षक गणेश म्हात्रे, राजेंद्र पाटील, नवनीत म्हात्रे आणि सीमा वैद्य यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमाच्या शेवटी गणेश म्हात्रे यांनी आयुक्त वैभव ढेरे व त्यांच्या परिवाराचे मनःपूर्वक आभार मानले.

# योग दिनानिमित्त कोयना ब्रदरचा स्तुत्य उपक्रम

### स्वच्छता मोहीम अन् वृक्षारोपण

**चौक : प्रतिनिधी**

योग दिनाचे औचित्य साधून कोयना जांब्रुक वावंढळ येथील तरुणांनी मारुती मंदिर, शंकर मंदिर आणि शिवकालीन तलाव परिसरात स्वच्छता मोहीम राबवून वृक्षारोपण केले. या उपक्रमातून तरुणांनी समाज प्रबोधनासाठी सकारात्मक संदेश दिला. सकाळी योग दिन साजरा केल्यानंतर सर्व उपस्थित तरुणांनी गावचे मारुती मंदिर, शिव मंदिर येथे स्वच्छता मोहीम राबवली. मंदिर परिसरात फुलझाडे आणि पर्यावरणपूरक झाडे लावण्यात आली.

शिवकालीन तलावाच्या परिसरात स्वच्छता राबवून प्लास्टिक संकलन केले. सुकलेले गवत कापणे व परिसर स्वच्छ करून तलावाच्या काठावर व भोवती वड, पिंपळ आणि पर्यावरणपूरक झाडे लावली. पूर्वी लावलेल्या झाडांची पुन्हा उभारणी करण्यात आली. लावलेल्या झाडांच्या आजूबाजूचे सुकलेले गवत काढून टाकण्यात आले. या उपक्रमात दोन तरुणांनी एक झाड दत्तक घेतले.

# रायगडात योग दिनाचा उत्साह

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रामानंदाचार्य नरेंद्राचार्य, दक्षिण पीठ, नाणीजधाम यांच्या प्रेरणेने रायगड युवा सेनेच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिल्हाभरात विविध ठिकाणी योग शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

युवा सेना पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक तसेच युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी होत योगासने, प्राणायाम आणि ध्यानसाधना केली.

योगामुळे शारीरिक व



मानसिक आरोग्य सुदृढ राहते तसेच निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करण्यास प्रेरणा मिळते, असा संदेश यावेळी देण्यात आला.

रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली समाजात आरोग्य, संस्कार आणि अध्यात्म यांचा प्रसार व्हावा या उद्देशाने विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. जागतिक योग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला सर्व स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रायगड युवा सेनेच्या सर्व तालुका पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून यशस्वी आयोजन केले.

# रायगडात होम स्टे, लॉज, स्टे रूमसाठी कडक नियमावली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्था तसेच राष्ट्रीय सुरक्षा आबाधित राखण्यासाठी जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रातील होम स्टे, लॉजेस, स्टे रूम, बंगले, ब्रेड अॅण्ड ब्रेकफास्ट सुविधांसाठी नियमावली लागू करण्यात आली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३, भारतीय न्याय संहिता २०२३ व मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील तरतुदींचा विचार करून जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी हे आदेश जारी केले आहेत.

रायगड जिल्हा प्रमुख पर्यटन क्षेत्र असल्याने जिल्ह्यात विविध ठिकाणी पर्यटक मोठ्या प्रमाणात वास्तव्यासाठी येतात. या पर्यटकांच्या निवासासाठी अनेक होमस्टे, लॉजेस, स्टे रूम, बंगले, ब्रेड अॅण्ड ब्रेकफास्ट सुविधा उपलब्ध आहेत. मात्र, अलिकडील काळात काही समाजविघातक प्रवृत्तीचे लोक, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले घटक तसेच काही परदेशी नागरिक निर्जन अथवा दुर्गम ठिकाणी असलेली निवासस्थाने वास्तव्यासाठी वापरतात. यातून बेकायदेशीर कृत्ये, अवैध व्यवसाय, राष्ट्रविरोधी अथवा समाजविघातक हालचाली घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर या आस्थापनांवर पर्यटक किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस भाडेतत्त्वावर निवास दिल्यानंतर नियम व अटींच्या अधीन राहून अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक आहे.

एखाद्या व्यक्तीस निवास भाडेतत्त्वावर देताना आस्थापना मालकाने त्या व्यक्तींची परिपूर्ण माहिती नोंदविणे अनिवार्य आहे. यामध्ये येणाऱ्या व्यक्तीचे पूर्ण नाव, सोबतच्या व्यक्ती, मोबाईल क्रमांक, स्थायी व तात्पुरता पत्ता, व्यवसाय/प्रवासाचे कारण, येण्याची व जाण्याची तारीख-वेळ, वाहन क्रमांक, सहप्रवासी असल्यास त्यांचीही माहिती तसेच प्रत्येकाचा एक फोटो ओळखपत्राची प्रत घेणे बंधनकारक आहे. ही माहिती गेस्ट रजिस्टर, ऑनलाईन लॉगबुक किंवा डिजिटल फॉर्ममध्ये नोंदवणे आवश्यक आहे. रजिस्टर किमान दोन वर्षे जतन करणे अनिवार्य असून पोलीस तपासणीसाठी ते तत्काळ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना पालकांशिवाय राहण्यास परवानगी देऊ नये.

सर्व आस्थापनांनी प्रवेशद्वार, रिसेप्शन, कॉरिडॉर्स, स्विमिंग पूल, पार्किंग येथे सीसीटीव्ही बसविणे अनिवार्य आहे. रेकॉर्डिंग किमान ३० दिवस जतन करणे आवश्यक आहे. कॅमेरे नेहमी कार्यरत व तारीख-वेळ योग्य असावी. पोलीस तपासणीसाठी मागणी केल्यास फुटेज देणे अनिवार्य आहे. संशयास्पद व्यक्ती, वस्तू किंवा वर्तन दिसल्यास तात्काळ स्थानिक पोलीस स्टेशनशी संपर्क करावा. ओळखपत्र नसलेल्या किंवा चुकीची माहिती देणाऱ्या व्यक्तींना निवास देऊ नये.

# मुख्याध्यापक अरुण खुळपे सेवानिवृत्त



**मुरूड : प्रतिनिधी**

पीटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यामंदिर येथील मुख्याध्यापक अरुण खुळपे ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती सोहळा विद्यालयात मोठ्या उत्साहात झाला. व्यवस्थापन कमिटी, शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व माजी विद्यार्थ्यांनी त्यांचा भावपूर्ण सत्कार केला.

कार्यक्रमाला असंख्य ग्रामस्थ, सहकारी शिक्षक व विविध शाळांचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अरुण खुळपे यांना शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व कपड्यांचा आहेर दाम्पत्यास प्रदान करण्यात आला. कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त महादेव गोळे, अध्यक्ष गणपत जगताप, उपाध्यक्ष मनोहर गायकवाड, लक्ष्मण मनवल, सचिव गोविंद ठाकर, ज्येष्ठ संचालक कृष्णा पंदेरे, मुख्याध्यापक अकिल मुलाणी, माजी मुख्याध्यापक संतोष रेडीज, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, माजी पर्यवेक्षक दुर्वास भोईर, मुंबई उच्च न्यायालयाचे वकील दंडे, शहरप्रमुख राकेश वडके, सदस्य राजू थिटेकर, उद्योजक पांडुरंग महाडिक, उद्योजक प्रकाश खेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मे. सिडकोमार्फत त्यांच्याकडील १२.५ टक्के योजनेअंतर्गत मुळ भुखंड मालक यांच्या लाभांत इरादित करण्यात आलेला भुखंड हा गुंतवणूकदार **श्री. जव्वाद मनसुर पटेल** यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले असून त्यांनी स्विकारलेल्या जबाबदारीने मे. सिडकोकडून भुखंड हस्तांतरणासंदर्भातील पुर्वपरवानगी प्राप्त करुन सदर भुखंड हा आमच्या अशिलांच्या हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे-

**भुखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्रफळ चौ. मी. |
|---|---|---|---|
| द्रोणागिरी नोड, ता. उरण, जि. रायगड | ३३ | ६५ | ९०० चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडांचे गुंतवणूकदार यांनी स्विकारलेल्या जबाबदारीने आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण पुर्वपरवानगी स्विकारुन त्रिपक्षीय करारनामा निष्पादित व नोंदणी करुन घेण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडांचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर भुखंडांवर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांच्या आत** सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरचे भुखंड हे सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरहु भुखंडासंदर्भातील संपूर्ण व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

दिनांक : २२/०६/२०२६

**सही/-**
**अॅड. धनंदा प्रदिप मोकल**

पत्ता : शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर - ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८



**NOTICE**

[Under the Bye-law No. 34]

**Shri. Vinay Shrikrishan Ghiya** a Member of the Vasant-Aalap Co-operative Housing Society Ltd. having, address at Cts.no./F.P.No.494, Near market yard, Panvel, Tal.Panvel, Dist. Raigad. 410206 and holding flat/ tenement no.B-101 in the building of the society, died on 28/08/2025 without making any nomination.

The society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants/ objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/ property of the society within a period of 13 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/ her/their claims/ objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society. If no claims/ objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/ property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/ objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the society/ with the secretary of the society between 10 A.M.to 1 P.M. from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Place : Panvel
Date : 22/06/2026

**Sd/-**
**(Secretary)**

For and on behalf of
The Vasant-Aalap Co-op. Housing Society Ltd
F. P. No. 494, Market Yard, Near Hotel Sameer,
Panvel, Dist. Raigad - 410 206.

# सिडकोच्या अखत्यारीतील तीन स्थानके मध्य रेल्वेकडे हस्तांतरित



## तरघर, खारकोपर आणि बामनडोंगरी स्टेशन आता मध्य रेल्वेच्या ताब्यात

**नवी मुंबई : बातमीदार**

मध्ये रेल्वे आणि सिडको प्रशासन यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे गेली अनेक वर्ष नवी मुंबईकर रेल्वे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. दोन्ही प्राधिकरणे एकमेकांकडे बोट दाखवत असल्याने रेल्वे प्रवासी मात्र यात भरडला जात होता. अखेर १५ मे २०२६ रोजी खासदार नरेश म्हस्के यांनी दोन्ही प्राधिकरणातील अधिकाऱ्यांचा समन्वय घडवून आणला होता. आता खासदार नरेश म्हस्के यांच्या प्रयत्नांना यश आले असून सिडकोच्या ताब्यातील ३ स्थानके २२ जून रोजी मध्य रेल्वेकडे हस्तांतरित झाली आहेत. उर्वरित रेल्वे स्थानकांचेही मध्य रेल्वेकडे लवकरच हस्तांतर होणार असल्याने नवी मुंबईकर रेल्वे प्रवाशांचा प्रवास आता सुखकर होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयाचे प्रवाशांच्या वतीने शिवसैनिकांनी स्वागत करत खासदार नरेश म्हस्के यांचे आभार मानले आहेत.

सिडकोच्या ताब्यात असलेल्या वाशी ते बेलापूर आणि खारघर ते खांदेश्वर या स्थानकांसाठीचे देखभाल करार अनुक्रमे २००३ आणि २००८ मध्ये संपले होते. त्यानंतर कोणताही नवा करार झालेला नव्हता. तर ऐरोली, रबाळे, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, बामणडोंगरी, खारकोपर आणि खारघर या स्थानकांसाठी आजतागायत एकही देखभाल करार करण्यात आलेला नव्हता. यामुळे सुविधांअभावी प्रवाशांचे मेगा हाल होत होते.

खासदार नरेश म्हस्के यांनी याची गंभीर दखल घेत मध्ये रेल्वे आणि सिडको प्रशासन या दोन्ही प्राधिकरणातील अधिकाऱ्यांचा समन्वय घडवून आणत १५ मे २०२६ रोजी नवी मुंबईतील शिवसेना पदाधिकाऱ्यांसह छत्रपती शिवाजी महाराज स्थानक येथील मुख्यालयात बैठक घेतली होती. या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन येत्या ६ महिन्यात सिडकोच्या अखत्यारीतील सर्व स्थानके मध्ये रेल्वेकडे हस्तांतरण करण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार आज तीन स्थानकांची हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तरघर, खारकोपर आणि बामनडोंगरी ही तीन स्थानके अधिकृतपणे रेल्वेच्या ताब्यात हस्तांतरित झाली आहेत.

नवी मुंबई परिसरातील रेल्वे स्थानकांच्या दुरवस्थेबाबत आणि तेथील अपुऱ्या प्रवासी सुविधांबाबत खासदार म्हणून नरेश म्हस्के यांनी पदभार स्वीकारल्यापासून प्रवाशांच्या सतत तक्रारी प्राप्त होत होत्या. या समस्यांची दखल खासदार नरेश म्हस्के यांनी घेतली होती. 'रेल्वे सल्लागार समिती' चे सदस्य या नात्याने समितीच्या दिल्ली येथे होणाऱ्या बैठकांमध्ये खासदार नरेश म्हस्के यांनी हा विषय वारंवार मांडला होता. स्थानकांची झालेली पडझड, देखभालीचा अभाव आणि सुरक्षेचा प्रश्न यामुळे सामान्य प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. खासदार नरेश म्हस्के यांनी या बाबी निदर्शनास आणून दिल्यानंतर याची गंभीर दखल घेत रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश रेल्वे प्रशासनाला दिले होते.

सिडको भवन (बेलापुर ) येथे एका बैठकीत सिडको आणि मध्य रेल्वे यांच्यात सामंजस्य करार संपन्न झाला. खासदार नरेश म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत रेल्वे स्थानके हस्तांतरण प्रक्रियेप्रसंगी मध्य रेल्वेच्यावतीने अभिषेक कुमार गुप्ता हर्बर, संतोष गुंजन संतोष गुंजन ADEN/जुईनगर, जी. जवाहरलाल बॉम्बे, संजय चौरसिया डिव्हिसिओन, सिडकोच्या वतीने अशिवन सुषमा अशोक मुंद्रुगल (भा.प्र.से.)उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, डॉ. राजा दयानिधी संयुक्त व्यवस्थापकीय संचालक, सी. पितळे सहाय्यक अभियंता उपस्थित होते.

आज तरघर, खारकोपर आणि बामनडोंगरी ही तीन स्थानके अधिकृतपणे रेल्वेच्या ताब्यात हस्तांतरित झाली आहेत. उर्वरित स्थानकांबाबतही प्रक्रिया सुरू असून लवकरच ती पूर्ण होईल. काही अतिरिक्त जागा, ओपन स्पेस आणि त्यांच्या देखभालीसंदर्भातील विषयांवर सिडको आणि रेल्वे यांच्यात चर्चा सुरू आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रवाशांना अपेक्षित सुविधा मिळत नव्हत्या. मात्र आता स्थानके रेल्वेच्या ताब्यात गेल्यानंतर प्रवाशांना अधिक चांगल्या, दर्जेदार आणि सुसज्ज सुविधा मिळतील, असा विश्वास खासदार नरेश म्हस्के यांनी व्यक्त केला आहे. प्रवाशांच्या हिताचा हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय असून रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, सिडको आणि मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांचे खासदार नरेश म्हस्के यांनी आभार मानले आहेत.



## नेरूळ येथे सिडकोची धडक मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (न.मुं) विभागामार्फत नेरूळ नोड येथे निष्कासन मोहिम राबवून सिडको अधिसूचित जागेवरील नेरूळ सेक्टर २० मौजे नेरुळ सर्वे नंबर १५१ व १५२ येथील आरसीसी जोता व कॉलम (अंदाजे क्षेत्रफळ ५०० चौ. मी.) चे अनधिकृत बांधकाम ब्रेकर च्या सहाय्याने तोडले व कॉलमचे स्टील गॅस कटर च्या साहाय्याने कापुन जप्त केले.

अतिक्रमण सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करुन व सिडको महामंडळाकडून कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आले असल्यामुळे निष्कासित करण्यात आले.

सदरची मोहीम मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार व मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको अतिक्रमण विभागाचे अधिकारी, स्थानिक पोलिस अधिकारी व सिडको पोलीस पथक, सिडको सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्या सहभागाने यशस्वीपणे राबविण्यात आली. या कारवाईसाठी १५ ब्रेकर , ३ जीप, १५ कामगार वापरण्यात आले.

## सानपाडा ग्रामस्थ शिष्टमंडळाने घेतली महापौरांची भेट



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात सानपाडा ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन सानपाड्यातील आरक्षित भूखंडाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. महापौर .सुजाता पाटील यांच्या दालनात झालेल्या बैठकीस सभागृह नेते सागर नाईक, भाजप नगरसेविका शिल्पा ठाकूर, नगरसेविका शैला पाटील तसेच सानपाडा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष रुपेश ठाकूर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले की, सानपाडा येथील सिडको प्लॉट क्रमांक ५२०, ५२१ आणि ५२२ मिळून सुमारे ८ एकर क्षेत्रफळाची जमीन प्रारूप विकास आराखड्यात 'तलावासाठी' आरक्षित करण्यात आली आहे. मात्र, सिडकोने ही जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरित न करता त्या ठिकाणी पत्रा कंपाऊंड उभारण्याचे काम सुरू केल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.याबाबत शिष्टमंडळाने निवेदन सादर करून सिडकोने सुरू केलेले पत्रा कंपाऊंडचे काम तात्काळ थांबवावे, महापालिकेने एमआरटीपी कायद्याच्या कलम १२६ अन्वये संबंधित जमिनीचे तातडीने भूसंपादन करावे तसेच त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद स्थायी समितीमार्फत करण्यात यावी, अशी मागणी केली.ग्रामस्थांची बाजू ऐकून घेतल्यानंतर, या प्रकरणातील सर्व कायदेशीर बाबींची तपासणी करून, सिडको प्रशासनाशी चर्चा केली जाईल आणि ग्रामस्थांच्या हितासाठी योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन महापौर सुजाता पाटील व सभागृह नेते सागर नाईक यांनी शिष्टमंडळाला दिले.

## एमएनएम विद्यालयाची पर्यावरणपूरक सायकल रॅली

**उलवे :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. व विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पर्यावरणपूरक संदेश देणाऱ्या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. इयत्ता ८ वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहचविला.



उलवे सेक्टर १७, सेक्टर १८, सेक्टर ८ तसेच कोपरगाव परिसरातून काढण्यात आलेल्या या सायकलरॅलीद्वारे "सायकल वापरा, पर्यावरण वाचवा", "प्रदूषणमुक्त भारत घडवा" आणि "निरोगी जीवनासाठीसायकल चालवा" अशा संदेशांचे प्रसारण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी हातात जनजागृतीपर फलक घेऊननागरिकांचे लक्ष वेधून घेतले.रॅलीच्या अनुषंगाने उलवे वाहतूक पोलिस विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे तसेच सुरक्षितसायकल चालविण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास वाहतूक पोलिस अधिकारी श्रीमती वैशालीगलांडे, पोलिस हवालदार श्री. गोंधळी, पोलिस नाईक श्री. शिरसाढ, पोलिस अंमलदार श्री. शिंदे तसेच श्री.गायकवाड उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे पालन, रस्ते सुरक्षा आणि जबाबदारनागरिकत्वाचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी सायकलचा वापर वाढविण्याची गरज अधोरेखितकेली. वाढते वायू प्रदूषण, इंधनाचा वाढता वापर आणि पर्यावरणावरील दुष्परिणाम यावर सायकल हाप्रभावी पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले.विद्यालयाचे प्राचार्या .सो.सायली वडवलकर, पर्यवेक्षक,शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयीसंवेदनशीलता निर्माण करून सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात योग दिन उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात "आंतरराष्ट्रीय योग दिवस" उत्साहात साजरा केला गेला.



दरवर्षी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. हा दिवस लोकांना शारीरिक आणि मानसिक आरोग्याबाबत जागरुक करण्यासाठी आणि योगसाधनेला आपल्या जीवनशैलीत समाविष्ट करण्यासाठी समर्पित आहे.

२१ जून हा उत्तर गोलार्धातील सर्वात मोठा दिवस असतो. या दिवशी सूर्योदय लवकर होतो आणि दिवसभर जास्त काळ सूर्यप्रकाश असतो. योगशास्त्र आणि भारतीय संस्कृती नुसार हा काळ आध्यात्मिक प्रगतीसाठी आणि उर्जा मिळवण्यासाठी अत्यंत अनुकूल मानला जातो म्हणून २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा केला जातो.

१२ वी विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या सर्व विद्यार्थ्यांनी योग दिवसाचे महत्व समजून उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. ।तज वस्पिअपदह च्या संयुक्त विद्यमाने या योग दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. योग गुरु म्हणून पारुल सुबेदी आणि सुमेधा कुलकर्णी हे लाभले होते.योग दिनाचे आयोजन केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी प्राचार्या निशा नायर यांचे आभार मानले.

## श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

निरोगी दृष्टी हीच उज्वल भविष्याची गुरुकिल्ली या संदेशाला साकार करत आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेलbयेथे दिनांक २१ जून रोजी ई लाईट आय केअर फाउंडेशन यांच्या सहकार्याने बी.एड. विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



संस्थेचे चेअरमन धनराजजी विसपुते व संचालिका संगीता विसपुते यांच्या प्रेरणेतून तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिरासाठी ई लाईट आय केअर फाउंडेशनचे मा. श्री. अजय जैन (Master in Optometry) हे प्रमुख तज्ज्ञ म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासमवेत मा. श्री. दीपक मीना यांनीही नेत्र तपासणी प्रक्रियेत मोलाचे योगदान दिले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात करण्यात आली.

याप्रसंगी आरोग्य विभागाच्या प्रमुख डॉ. नेहा म्हात्रे यांनी प्रास्ताविक केले तर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सीमा कांबळे यांनी शिबिराची उद्दिष्टे स्पष्ट करत विद्यार्थ्यांना डोळ्यांचे आरोग्य, दृष्टीसंवर्धन, डिजिटल युगातील डोळ्यांची काळजी तसेच नियमित नेत्र तपासणीचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान जीवनशैलीत डोळ्यांवर वाढणारा ताण आणि त्यावरील उपाययोजना यांचीही त्यांनी प्रभावी मांडणी केली.

त्यानंतर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेत आपल्या दृष्टी आरोग्याबाबत आवश्यक माहिती व मार्गदर्शन प्राप्त केले.

आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्राध्यापिका सौ. सायली भगत यांनी प्रभावीपणे केले, तर छात्राध्यापिका सौ. रूपाली सरतापे यांनी उपस्थित मान्यवर, तज्ज्ञ आणि सहभागींचे मनःपूर्वक आभार मानले.

## गव्हाण विद्यालयात योग दिन साजरा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये आंतर्राष्ट्रीय योग दिनानिमित्त योगासने व प्राणायामांची प्रात्यक्षिके अत्यंत उत्साहात संपन्न झाली.



आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेच्या श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांनी विद्यार्थ्यांना विविध योग प्रात्यक्षिके व प्राणायमाचे विविध प्रकार करून दाखविले. विद्यार्थ्यांनीही अतिशय उत्स्फूर्तपणे या प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग नोंदवला.

यावेळी ज्येष्ठ शिक्षक तथा रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, विशांत ठाकूर, उज्वला म्हात्रे,संपदा म्हात्रे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे योग प्रात्यक्षिकांचे धडे गिरवले.

गव्हाण विद्यालयाच्या प्रांगणात सर्व वर्गातील विद्यार्थ्यांची सामूहिक प्राथमिक योगासने संपन्न झाल्यानंतर एम.एन.एम.विद्यालयाच्या सभागृहात पाचवी ते सहावी या वर्गातील विद्यार्थ्यांची योगासने संपन्न झाली. प्रारंभी जागतिक योग दिनाचे महत्त्व विशद करून विद्यालयाचे क्रीडाशिक्षक व योगशिक्षक सुरेश पारखे यांनी सर्व आसनांची त्यांच्या खास शैलीत माहिती सांगून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके करून दाखविली.



## सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक योग दिनाचा उत्साह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात युवा टुरिझममार्फत जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला. पतंजली योगपीठ संस्थेतर्फे योग प्रशिक्षक विकास देशमुख तसेच सहयोग शिक्षिका योगिता जगदाळे, रेणू गवे यांनी १२ वीच्या विद्यार्थ्यांकडून विविध योगासने करून घेतली. तसेच नवीन पनवेल येथील बाबूजी मेमोरियल आश्रम ' श्री रामचंद्र मिशन ' मेडिटेशन सेंटर तर्फे सुद्धा विद्यार्थ्यांसाठी योगासनांचे आयोजन केले होते. उत्तम आरोग्यासाठी योगासनांचे महत्त्व योग प्रशिक्षक विकास देशमुख यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले .याप्रसंगी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे,पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, व कर्मचारी उपस्थित होते.

## बीसीटी लॉ कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय, न्यू पनवेल येथे एक पृथ्वी, एक आरोग्य (Yoga for OneEarth, One Health) या जागतिक संकल्पनेवर आधारित आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ उत्साहात साजराकरण्यात आला. हा कार्यक्रम सहज योगाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचा उद्देश योग आणि ध्यानधारणेचे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक शांतता आणि भावनिकस्वास्थ्यासाठी असलेले महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत व समाजापर्यंत पोहोचवणे हा होता. या प्रसंगी सहज योगाचे मान्यवर मार्गदर्शक ॲड. आकाश घोलप यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितराहून योगाचे महत्त्व आणि निरोगी, संतुलित जीवनशैलीसाठी त्याची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले.

ध्यानधारणा आणि विश्रांती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रातून सहभागी विद्यार्थ्यांनाआणि प्राध्यापकांना मानसिक शांतता, सकारात्मक ऊर्जा आणि नवचैतन्याचा अनुभव घेता आला. कार्यक्रमात विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आणि उपयुक्त मार्गदर्शनाबद्दल समाधान व्यक्त केले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहाय्यक प्राध्यापिका धनश्री चौगुले, ऐश्वर्या पाटोळे, आणि सहाय्यक प्राध्यापिका नेहा काची यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करण्यात आले. सहज योगाच्या टीमचे तसेच उपस्थित सर्व विद्यार्थी,शिक्षक आणि सहभागींचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## गोवठणे रंगभूमीवरील कलाकारांचा सन्मान

**उरण : प्रतिनिधी**

जय हनुमान नाट्य मंडळाच्या ग्रामीण रंगभूमीने अनेक कलाकारांना नवा आत्मविश्वास, नवी ओळख दिली आहे. असे प्रतिपादन नटवर्य तथा ज्येष्ठ दिग्दर्शक पांडुरंग पाटील यांनी उरण तालुक्यातील गोवठणे येथील जय हनुमान नाट्य मंडळाच्या वतीने आयोजित सन्मान रंगभूमीवरील कलाकारांचा या कार्यक्रमात केले

हा कार्यक्रम गोवठणे येथील निसर्गरम्य डोंगरावर घेण्यात आला होता.यापुढे पांडुरंग पाटील यांनी आजच्या काळात रंगभूमी जिवंत ठेवणे हे सोपे काम नाही. मात्र या रंगभूमीला अभिनयाचा सुगंध असल्यामुळे या कलाकारांनी हि रंगभूमी जिवापाड जपली आहे. असे सांगितले.

या अनुषंगाने नटवर्य तथा दिग्दर्शक पांडुरंग पाटील, नाटककार धनेश्वर म्हात्रे, उद्योजक रमेश कोळी, रंगनायिका वैशाली मोहिते यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभली होती.



यावेळी मान्यवरांसह सहदिग्दर्शक शैलेंद्र म्हात्रे, नाट्य कलाकार लक्ष्मीकांत म्हात्रे, सुरेश म्हात्रे, कृष्णकांत म्हात्रे, नरेंद्र वर्तक, अशोक म्हात्रे, शितल म्हात्रे, हेमांगी म्हात्रे, निलेश म्हात्रे जगन वर्तक, रोहन म्हात्रे, विवेक वर्तक, आतिश वर्तक, प्रेम पाटील, अक्षय पाटील, महेश पाटील, चरण वर्तक, कांचन म्हात्रे, सोनम म्हात्रे, प्रियांका पाटील यांच्यासह नाट्य मंडळातील अन्य कलाकार व पडद्यामागील कलाकारांचा देखील मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# बामणोलीतील ग्रामस्थांचा भाजपत प्रवेश

## युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांची प्रमुख उपस्थिती





**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील बामणोली येथील ग्रामस्थांनी भारतीय जनता पक्षाच्या विचारसरणीवर विश्वास व्यक्त करत पक्षप्रवेश केला. जनतेचा वाढता पाठिंबा हीच आमच्या कार्याची खरी पावती असल्याचे भाजपचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

पक्षप्रवेश कार्यक्रम भाजपचे दक्षिण रायगड युवामोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, तालुकाध्यक्ष परेश सांगले, तालुका सरचिटणीस बाबूराव चव्हाण, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्षा रुपाली कासारे, महिला मोर्चा तालुकाध्यक्षा रचना थोरे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष योगेश खडतर, संतोष कळंबे, अमोल पवार, राजू तेडगुरे, समीर बक्कम, अनिल दांडेकर, संतोष महाराज पवार, समीर पवार, राजेश पवार या प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी साधू शिंदे, महेंद्र पवार, विठोबा पवार, हरी पवार, राजेश पवार, छाया मालोरे, सुरेश मालोरे, राजाराम मालोरे, दीपक पवार, सहदेव पवार, राकेश पवार, सदाशिव पवार, विजय मालोरे, लहू पवार, संगीता पवार, रमेश पवार, विलास पवार, नामदेव पवार, दिनेश उभारे, लक्ष्मण शिंदे, संतोष उभारे, अनंत सुतार, अशोक सुतार, मंगेश सुतार, हनुमंत वाघलेकर, शेखर पवार, संतोष कडू, महादेव कडू, सतीश भालेकर, बाळाराम पवार, अक्षय पवार, सखाराम पवार, सचिन पवार, संभाजी पवार, हरी पवार, दगडी भोईर, सुमित पवार, शिवाजी पवार, काळूराम पवार, बाबू मालोरे, कौस्तुभ पवार आदी ग्रामस्थांनी भाजपत प्रवेश केल्याचे जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी सांगितले.

# श्रीवर्धनमध्ये रिमझिम पावसाला सुरुवात

## नागरिकांना उकाड्यापासून दिलासा

**श्रीवर्धन : बातमीदार**

अखेर प्रतीक्षा संपून सोमवारी (दि. २२) पहाटे तीन ते चारच्या दरम्यान श्रीवर्धन परिसरात रिमझिम पावसाला सुरुवात झाली. पाऊस पडल्यामुळे हवेत गारवा आल्याने मागील काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. रविवारी दिवसभर व रात्रीपर्यंत उकाड्याने नागरिक अक्षरशः हैराण झाले होते. हवेतील सापेक्ष आर्द्रता मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या, परंतु पहाटे तीनच्या सुमारास रिमझिम पाऊस व हलकासा वारा सुरू झाल्यानंतर हवेमध्ये सुखद गारवा जाणवू लागला.

त्यामुळे नागरिकांनी उकाड्यापासून सुटकेचा निःश्वास टाकला. मागील दोन ते तीन दिवसांपासून समुद्राच्या पाण्यामध्ये बदल जाणवू लागले होते. समुद्राच्या पाण्याचा रंग लाल दिसू लागला होता व लाटादेखील खूप मोठ्या प्रमाणावर उसळताना पाहायला मिळत होत्या. यावरूनच जाणकारांनी येत्या दोन दिवसांमध्ये पावसाचे आगमन होईल, असा अंदाज व्यक्त केला होता आणि त्यानुसार २२ तारखेच्या पहाटेला पावसाने सुरुवात केली. सकाळी ९ ते १२च्या दरम्यानदेखील काही हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी श्रीवर्धन परिसरात कोसळल्या.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार मंगळवारी सायंकाळपासून श्रीवर्धन परिसरात तसेच रायगड जिल्ह्यामध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळतील व ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहतील, असा इशारा देण्यात आला आहे. विशेष बाब म्हणजे पाऊस पडू लागल्यानंतर महावितरणचा वीजपुरवठा खंडित झाला नाही. नाहीतर पहिल्या पावसामध्ये थोडा पाऊस पडला तरीदेखील वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वारंवार घडत असतात. रात्री बऱ्यापैकी पाऊस पडल्यास शेतकरी आपल्या भात पेरणीला सुरुवात करतील. १५ ते २० दिवस मुसळधार पाऊस झाल्यानंतरच श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या रानवली पाझर तलावामध्ये पाणी जमा होईल आणि शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा सुरू करण्यात येईल. दरम्यान, यापुढे पावसाचे प्रमाण कसे राहील यावरही शेतकऱ्यांची बरीचशी गणिते अवलंबून राहणार आहेत.

# एक्स्प्रेस वेवर पहाटे दरोडा

## तोंड बांधून आलेल्या चौकडीने ट्रकमधील तिघांना लुटले

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खालापूर हद्दीतील सावरोली टोलनाक्याजवळ रविवारी (दि. २१) पहाटे लघुशंकेसाठी थांबलेल्या ट्रकमधील तिघांना तोंडावर रुमाल बांधून आलेल्या चौघांनी जबर मारहाण करत ५४ हजार रुपयांची रोकड लुटून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

मालाड, मुंबई येथील सुभाष श्रीपती झांजले (५५) आणि संतोष नामदेव झांजले (५०) हे दोघे चुलत भाऊ भोर येथून मुंबईच्या दिशेने ट्रकमधून प्रवास करत होते. रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास खालापूर हद्दीत सावरोली टोलनाक्याजवळ ट्रक चालकासह ते तिघे लघुशंकेसाठी थांबले. त्याचवेळी तोंडावर रुमाल बांधलेले चार अज्ञात इसम तेथे आले.

त्यांनी सुभाष, संतोष आणि ट्रक चालकाला जबर मारहाण केली व त्यांच्याजवळील ५४ हजार रुपये रोख रक्कम हिसकावून पसार झाले.

मारहाणीमुळे घाबरलेल्या तिघांनी तत्काळ पोलीस ठाणे गाठण्याऐवजी थेट मुंबई गाठली. घरी पोहोचल्यावर नातेवाईकांशी चर्चा केल्यानंतर सोमवारी उशिरा त्यांनी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत हाके अधिक तपास करीत आहेत. ट्रक चालकाचे नाव अद्याप समजू शकलेले नाही. दरम्यान, या घटनेमुळे आजूबाजूच्या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# दांड फाट्यावर अपघातांचे सत्र : सुरक्षा उपाययोजनांची मागणी

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४वर दांड फाटा येथे पाईपलाईनसाठी वर्षभरापासून खोदून ठेवलेल्या रस्त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होऊन अपघातांची मालिका सुरू आहे. नुकतेच दोन निष्पाप जीव गेल्याने सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील सोनटक्के यांनी येथे तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ म्हणजेच जुन्या मुंबई-पुणे रस्त्यावर दांड फाटा येथे प्रवासी आणि वाहनांसाठी सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील सोनटक्के यांनी केली आहे. खोपोलीहून रसायनीकडे जाताना दांड फाटा हे स्थानक लागते. या स्थानकाच्या सुमारे वीस मीटर मागे रसायनीकडे जाणारा मार्ग आहे. पाईप लाईन टाकण्यासाठी गेले वर्षभर हा रस्ता खोदून ठेवला आहे. त्यामुळे रसायनी-मोहपाडा कडे जाणाऱ्या गाड्या दांड फाटा स्थानकाला डाव्या बाजूने वळसा घालून जातात, तर रसायनी-मोहपाडा येथून येणाऱ्या गाड्या पनवेल व खोपोली दिशेने जातात.हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग असल्याने पनवेलकडे जाणाऱ्या गाड्या भरधाव वेगाने जातात, मात्र दांड फाटा येथे एसटी व नवी मुंबई महानगरपालिका परिवहनच्या गाड्यांना थांबा असल्याने त्या स्थानकावर प्रवाशांसाठी थांबतात.

खोपोलीहून रसायनी-मोहपाडा कडे जाणाऱ्या गाड्यांचा वेग कमी होतो. त्यातच रसायनी-मोहपाडा येथून खोपोलीकडे जाणाऱ्या गाड्यांमुळे वाहतूक मंदावते.त्यामुळे खोपोलीहून पनवेलकडे जाणाऱ्या गाडीचा वेग चालकाला आवरता आला नाही तर अपघात होतात. नुकतेच या ठिकाणी दोन जणांचा मृत्यू झाला आहे. ही हद्द रसायनी पोलीस ठाण्याची की खालापूर पोलीस ठाण्याची यावर निर्णय न झाल्याने तक्रार कुठे करायची, असा प्रश्न अपघातग्रस्तांना पडला आहे.

# अलिबाग मतदारसंघात एसआरए कार्यक्रमांतर्गत ७७ टक्के मॅपिंग पूर्ण

## ऑक्टोबरमध्ये अंतिम यादी



**अलिबाग : प्रतिनिधी**

मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण (एसआरए) कार्यक्रमांतर्गत अलिबाग विधानसभा मतदारसंघातील एकूण तीन लाख पाच हजार ४८० मतदारांपैकी दोन लाख ३४ हजार ८७४ म्हणजेच ७७ टक्के मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. उर्वरित ७० हजार ६३९ मतदारांचे मॅपिंग अद्याप बाकी असून केंद्रस्तरीय अधिकारी घराघरांत जाऊन माहिती अद्ययावत करणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दिली.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अलिबाग विधानसभा मतदारयादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मतदारांच्या माहितीची पडताळणी आणि मॅपिंगचे काम सध्या सुरू आहे. ३० जून ते २९ जुलै या कालावधीत केंद्रस्तरीय अधिकारी घराघरांत जाऊन मतदारांची माहिती अद्ययावत करणार आहेत. ज्या मतदारांचे मॅपिंग अद्याप झालेले नाही, त्यांच्याकडून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून माहिती नोंदविण्यात येणार आहे. पुनरिक्षण कार्यक्रमानुसार ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार असून त्यानंतर दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत.

अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर रोजी प्रकाशित करण्यात येणार आहे. यापुढे १२०० मतदारांसाठी एक मतदान केंद्र असेल. अलिबाग मतदारसंघात सध्या ३७५ मतदान केंद्रे आहेत. त्यात नवीन ३९ मतदान केंद्रांची भर पडणार आहे. त्यामुळे अलिबाग विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांची संख्या वाढून ४१४ इतकी होणार आहे, अशी माहिती मुकेश चव्हाण यांनी दिली. मतदार https://voters.eci.gov.in/ या संकेतस्थळावर जाऊन आपले तसेच आपल्या नातेवाइकांचे नाव २००२ साली कोठे होते ते तपासून घेऊ शकतात.

# रोहा ब्राह्मण मंडळातर्फे संततधार अनुष्ठान



**रोहा : प्रतिनिधी**

ब्राह्मण मंडळ रोहातर्फे पाऊस लवकर पडण्यासाठी व चांगली पर्जन्यवृष्टी होण्यासाठी रविवार (दि. २१) श्री ओंकारेश्वर मंदिर येथे सर्व ब्रह्मवृंदाच्या मार्गदर्शनाखाली सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत संततधार अनुष्ठानाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ६ वाजल्यापासून अनुष्ठानाला सुरुवात झाली आणि दुपारपासून रोह्यामध्ये वरूणराजानेही हजेरी लावत हे अनुष्ठान सफल झाल्याची प्रचिती दिली. अनुष्ठान यशस्वी होण्यासाठी सर्व ब्रह्मवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली ब्राह्मण मंडळ रोहा कमिटी सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# महाबँक सेवानिवृत्त परिवाराकडून नांदगावच्या विद्यार्थ्यांना साहित्य भेट

**पाली : प्रतिनिधी**

सेवानिवृत्तीनंतरही समाजाचे ऋण फेडण्याच्या भावनेतून महाबँक सेवा निवृत्त परिवार, डोंबिवली यांच्या वतीने सुधागड तालुक्यातील संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव येथील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

महाबँकेच्या निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन हा उपक्रम राबविला आहे. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जगदीश सुतार, प्राचार्य अशोक शिंदे व शिक्षकवृंद यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. या शैक्षणिक साहित्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शालेय दप्तर, १०० पानी व २०० पानी लाँग बुक यांचा समावेश होता. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

यावेळी बोलताना प्राचार्य अशोक शिंदे म्हणाले की, महाबँकेच्या निवृत्त परिवाराने दाखवलेली ही सामाजिक बांधिलकी इतरांसाठी आदर्शवत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केलेली ही मदत मोलाची आहे. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी नक्कीच प्रोत्साहन मिळेल. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जगदीश सुतार यांनीही महाबँक परिवाराचे आभार मानले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# जिल्हा रुग्णालयात सिकलसेल दिनानिमित्त ६२ नागरिकांची तपासणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालय, रायगड-अलिबाग येथे १९ जून रोजी जागतिक सिकलसेल दिनाचे औचित्य साधून विशेष जनजागृती आणि तपासणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपस्थित रुग्ण, गरोदर माता आणि नागरिकांना सिकलसेल आजाराविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच ६२ नागरिकांची सिकलसेल सोल्यूबिलीटी तपासणी करण्यात आली.



या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक निशीकांत पाटील, प्रभारी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक स्वाती नाईक यांच्यासह सहायक अधीसेविका अनिता भोपी, रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, परिचारिका, नर्सिंगच्या विद्यार्थिनी, गरोदर माता आणि इतर रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना सिकलसेल आजाराची प्राथमिक व महत्त्वाची माहिती देण्यात आली. सिकलसेल हा एक अनुवांशिक रक्ताचा आजार आहे, जो पालकांकडून मुलांमध्ये संक्रमित होतो. सामान्यतः रक्तातील तांबड्या पेशी गोल आणि लवचिक असतात, ज्यामुळे शरीराला पुरेसा ऑक्सिजन मिळतो. मात्र, सिकलसेल आजारात या पेशींचा आकार बदलून तो विळ्यासारखा कडक होतो. या कडक पेशी रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण करतात, ज्यामुळे शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठा खंडित होतो. परिणामी तीव्र अंगदुखी, सांधेदुखी, थकवा आणि ॲनिमिया यांसारख्या त्रासाला सामोरे जावे लागते. गरोदर मातांची वेळेत तपासणी केल्यास हा आजार पुढील पिढीत जाण्यापासून रोखता येऊ शकतो.

# राज्यपालांच्या हस्ते रातवड विद्यालयाला स्कूलबसचे लोकार्पण

**माणगाव : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कार्यरत असलेल्या छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड, तालुका माणगाव या विद्यालयाला सुमन रमेश तुलसीयानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्या उदार सहकार्याने प्रदान करण्यात आलेल्या टाटा विंगर स्कूल बसचे लोकार्पण राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते शनिवारी (दि. २०) राजभवन, मुंबई येथे उत्साहात झाले.



विद्यालयाच्या कार्याची दखल घेत सुमन रमेश तुलसीयानी ट्रस्टने विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची समस्या दूर करण्यासाठी ही आधुनिक स्कूल बस उपलब्ध करून दिली आहे. मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या या ग्रामीण विद्यालयात आठ गावे व चार आदिवासी वाड्यांमधील विद्यार्थी शिक्षण घेत असून अनेक विद्यार्थ्यांना दररोज लांब अंतर पायी प्रवास करावा लागत होता. या बसमुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित, सुलभ आणि वेळेवर शाळेत पोहचण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

या लोकार्पण सोहळ्यास संस्थेचे सरचिटणीस निलेश रेवगडे, श्रीनिवास दातार, शालेय समिती अध्यक्ष सुनील पाटील, ट्रस्टचे प्रतिनिधी मनीष रुपानी, नाना पालकर स्मृती समितीचे पदाधिकारी रायगड भूषण कृष्णा महाडिक, विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम, शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी सुमन रमेश तुलसीयानी ट्रस्टच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी वाहतुकीची सुविधा अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची नवी संधी उपलब्ध होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

मुख्याध्यापक संतोष कदम यांनी विद्यालयाच्या वतीने सुमन रमेश तुलसीयानी ट्रस्ट, मुंबई, तसेच विद्यालयाच्या विकासासाठी सातत्याने सहकार्य करणाऱ्या सर्व दानशूर व्यक्ती व संस्थांचे मनःपूर्वक आभार मानले. या लोकार्पण सोहळ्यामुळे विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामीण शिक्षणाच्या उन्नतीसाठी सुमन रमेश तुलसीयानी ट्रस्टने दिलेले हे योगदान प्रेरणादायी असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. सुमन रमेश चॅरिटेबल ट्रस्ट गेली कित्येक वर्षे सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात काम करत असून झारखंडसह अनेक राज्यांमध्ये आरोग्यविषयक व शैक्षणिक क्षेत्रात काम करत आहे. ट्रस्टच्या माध्यमातून आजपर्यंत विविध शाळांना एकूण नऊ स्कूल बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# इजिप्तचा ऐतिहासिक विजय!

## मोहम्मद सालाहचा निर्णायक गोल; न्यूझीलंडवर मात

**व्हँकूवर : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत इजिप्तच्या संघाने नवा इतिहास रचला आहे. रविवारी रात्री बीसी प्लेस स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात स्टार खेळाडू मोहम्मद सालाहच्या निर्णायक गोलच्या जोरावर इजिप्तने न्यूझीलंडचा ३-१ असा पराभव करत स्पर्धेतील आपला पहिलावहिला विजय नोंदवला. या विजयामुळे इजिप्तच्या चाहत्यांमध्ये आनंदाची लाट उसळली आहे.



सामन्याची सुरुवात न्यूझीलंडसाठी आश्वासक ठरली. १५व्या मिनिटाला फिन सरमनने हेडरद्वारे गोल करत न्यूझीलंडला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या हाफमध्ये इजिप्तने बरोबरी साधण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना यश आले नाही.

मध्यंतरानंतर मात्र इजिप्तच्या संघाने पूर्णपणे वेगळ्या आवेशात मैदानात उतरण्याचे ठरवले होते. ५८व्या मिनिटाला मोस्तफा झिकोने शानदार हेडर मारत संघाला १-१ अशी बरोबरी मिळवून दिली. त्यानंतर मोहम्मद सालाहने झिकोच्या बॅक-हील पासवर गोल करत संघाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. सामन्याच्या ८२व्या मिनिटाला ट्रेझेगेटच्या डायव्हिंग हेडरने इजिप्तच्या विजयावर ३-१ अशी मोहोर उमटवली.

सामन्यानंतर इजिप्तचे प्रशिक्षक होसाम हसन यांनी खेळाडूंच्या जिद्दीचे कौतुक केले. ते म्हणाले, आम्ही ठरवले होते की जोपर्यंत विजय मिळवत नाही, तोपर्यंत मैदान सोडायचे नाही. खेळाडूंनी आज दाखवलेली जिद्द वाखाणण्याजोगी आहे, तर मोहम्मद सालाहने हा विजय आपल्या संघासाठी अत्यंत खास असल्याचे सांगितले. या गोलमुळे सालाह आता राष्ट्रीय संघाच्या सर्वकालीन सर्वाधिक गोल करण्याच्या विक्रमाच्या अगदी जवळ पोहचला आहे.

# आयसीसीची इंग्लंड संघावर मोठी कारवाई

## ‘डब्ल्यूटीसी’मधील तब्बल १२ गुण वजा

**लंडन : वृत्तसंस्था**

जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) अंतिम फेरीत पहिल्यांदाच स्थान मिळवण्याचे इंग्लंडचे स्वप्न मोठ्या संकटात सापडले आहे. न्यूझीलंडविरुद्ध ओव्हल येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत धीम्या षटकगतीचा फटका इंग्लंडला बसला असून आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) संघावर कठोर कारवाई करत तब्बल १२ गुण वजा केले आहेत. याशिवाय खेळाडूंना सामना शुल्काच्या ५० टक्के दंडालाही सामोरे जावे लागणार आहे.



ओव्हल कसोटीत न्यूझीलंडने शानदार कामगिरी करत इंग्लंडचा २५३ धावांनी पराभव केला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत बरोबरी साधली, मात्र या पराभवानंतर इंग्लंडच्या अडचणी आणखी वाढल्या. सामन्यानंतर झालेल्या तपासणीत इंग्लंड संघ निर्धारित वेळेपेक्षा १२ षटके मागे असल्याचे आढळून आले. आयसीसीच्या नियमांनुसार प्रत्येक कमी षटकासाठी डब्ल्यूटीसी गुणांची कपात करण्यात येते. त्यामुळे इंग्लंडला १२ गुण गमवावे लागले.

आयसीसीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रभारी कर्णधार जो रूटने संघाची चूक मान्य केली असून प्रस्तावित शिक्षेलाही सहमती दर्शवली. त्यामुळे औपचारिक सुनावणीची गरज पडली नाही आणि शिक्षा तत्काळ लागू करण्यात आली.

या दंडात्मक कारवाईमुळे इंग्लंडच्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमधील स्थानाला मोठा धक्का बसला आहे. संघ सातव्या स्थानावर कायम असला, तरी त्यांची गुणांची टक्केवारी ३४.७२वरून थेट २६.८३पर्यंत घसरली आहे. परिणामी अंतिम फेरीच्या शर्यतीत त्यांची स्थिती अधिकच कमकुवत झाली आहे.

# इराणने बेल्जियमलाही बरोबरीत रोखले



**लॉस एंजेलिस : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील गट ‘जी’मधील लढतीत इराणने गोलरक्षक अलीरेझा बैरानवंदच्या दमदार कामगिरीच्या जोरावर बेल्जियमला गोलशून्य बरोबरीत रोखले. हा निकाल यंदाच्या हंगामातील दुसरा सर्वात मोठा उलटफेर ठरला.

याआधी केप व्हर्डेने दोन वेळच्या स्पेनला रोखून आश्चर्यकारक निकालाची नोंद केली होती. कमालीची गोष्ट म्हणजे त्या सामन्यात केप व्हर्डेच्या ४० वर्षीय गोलरक्षकाने अभेद्य भिंत बनत स्पेनला रोखले होते. आता इराणसाठी बैरानवंद अभेद्य भिंत ठरल्याचे पहायला मिळाले.

बेल्जियम संघ फुटबॉल जगतातील सर्वोत्तम १० संघांपैकी एक आहे. जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर असलेल्या संघाला २०व्या क्रमांकावरील इराणने फक्त रोखले नाही, तर आपल्या गटात गुणतालिकेत अव्वलस्थान पटकावले.

केविन डी ब्रुयने आणि रोमेलू लुकाकू यांसारख्या अनुभवी खेळाडूंनी सजलेल्या बेल्जियम संघाने चेंडूवरील नियंत्रण राखले, मात्र इराणच्या भक्कम बचावफळीसमोर त्यांना स्पष्ट गोलसंधी निर्माण करण्यात अपयश आले.

या निकालामुळे ‘रेड डेव्हिल्स’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेल्जियमसमोर सलग दुसऱ्या विश्वचषकात गट टप्प्यातून बाहेर पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

युद्धानंतर फिफा वर्ल्डकप स्पर्धेत खेळताना इराणच्या संघाच्या हालचालींवर काही निर्बंध असल्याची चर्चा रंगली आहे. या परिस्थितीतही इराणने दमदार कामगिरी करून दाखवली. त्यामुळे हा अनिर्णित सामनाही इराणसाठी खास ठरतो.

### बैरानवंदचा भक्कम बचाव

बेल्जियमविरुद्धच्या सामन्यात बैरानवंदने सात बचाव केले. त्यापैकी अनेक गोलरेषेवरील निर्णायक बचाव होते. त्याने ३४ पैकी २० पास यशस्वी केले, तर २४ लाँग बॉलपैकी ११ आपल्या सहकाऱ्यांपर्यंत पोहचवले.

दोन गुणांसह बेल्जियम अद्याप स्पर्धेत टिकून आहे आणि त्यांचा अखेरचा साखळी सामना न्यूझीलंडविरुद्ध होणार आहे.

# खाशाबा जाधव पुरस्कार बंडा पाटील यांना जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पुण्यातील ध्रुवतारा फाऊंडेशनकडून दिला जाणारा खाशाबा जाधव पुरस्काराने ऑलिम्पिकपटू बंडा पाटील यांना सन्मानित करण्यात येणार आहे. कोल्हापुरात ऑलिम्पिक दिनानिमित्त मंगळवारी (दि.२३) पुरस्कार वितरण समारंभ होईल.



कोल्हापूरातील मेन राजाराम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या सभागृहात सकाळी १० वाजता उद्योजक रोहित मुसळे, मनिष झंवर यांच्या हस्ते बंडा पाटील यांना पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. शाल, श्रीफळ, गौरवचिन्ह, रोख पाच हजार रुपये आणि पुस्तक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत पनवेल सिटी संघाची दमदार कामगिरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इंदूर (मध्य प्रदेश) येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा (सब-ज्युनिअर मुले व मुली गट)मध्ये पनवेल सिटी किकबॉक्सिंग संघाने उत्कृष्ट कामगिरी करत एक सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्य अशी एकूण सात पदके जिंकली.

या स्पर्धेत इशान कुंभार याने लाईट कॉन्टॅक्ट प्रकारात सुवर्णपदक आणि किक लाईट प्रकारात कांस्यपदक मिळविले. स्वरा कालेल व ध्रुववंश हिरावे यांनी किक लाईट प्रकारात

### सात पदकांची कमाई

रौप्यपदकांची कमाई केली, तर अन्वी निकम, लावण्या इशी आणि सेजल मुसळे यांनी अनुक्रमे कांस्यपदके पटकावली.

या यशस्वी खेळाडूंना संघाचे प्रशिक्षक सिद्धेश कदम, संजय पाटील, योगेश बैकर आणि रोहित थळी यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे पनवेल सिटी किकबॉक्सिंग असोसिएशनचे सचिव डॉ. मंदार पनवेलकर आणि कार्याध्यक्ष निलेश भोसले यांनी खेळाडूंना प्रोत्साहन व सहकार्य केले. राष्ट्रीय स्तरावरील या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व खेळाडू, प्रशिक्षक व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

# भारतीय महिला संघासाठी सेमीचे समीकरण झाले कठीण!

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यात हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाला पराभवाचा सामना करावा लागला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने टीम इंडियाला सहा विकेट्सनी पराभूत करत सेमीफायनलच्या शर्यतीत मोठा ट्विस्ट आणला आहे.



मँचेस्टरमधील एमिरेट्स ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानात १५८ धावांचा बचाव करताना श्री चरणीसह शफाली वर्माने उत्तम गोलंदाजी केली, पण दक्षिण आफ्रिकेच्या संघाकडून चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अष्टपैलू मरिझन कॅपच्या ४५ चेंडूंतील नाबाद ८१ धावांच्या खेळीच्या जोरावर गत हंगामातील उपविजेत्यांनी १५९ धावांचे लक्ष्य १९.१ षटकांत चार विकेट्स गमावत गाठले.

मँचेस्टरमधील या पराभवामुळे भारतीय महिला संघाचे उपांत्य फेरी गाठण्याचे समीकरण अधिक आव्हानात्मक झाले आहे. या पराभवानंतरही भारतीय संघ ‘अ’ गटात गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर असला, तरी उपांत्य फेरीत पोहचण्याच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी हरमन ब्रिगेडला उर्वरित दोन्ही साखळी सामने जिंकणे गरजेचे असेल. या निकालानंतर ‘अ’ गट खऱ्या अर्थाने ‘डेथ ग्रुप’ ठरल्याचे चित्र दिसत आहे.

महिला टी-२० विश्वचषक २०२६च्या स्पर्धेच्या स्वरूपानुसार प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. भारताचा पुढील सामना गुरुवारी (दि.२५) ओल्ड ट्रॅफर्ड येथे बांगलादेशविरुद्ध होणार आहे. त्यानंतर रविवारी (दि.२८) लॉर्ड्सवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध टीम इंडिया मैदानात उतरणार आहे. जर भारताने उर्वरित दोनपैकी एक सामना जरी गमावला आणि दक्षिण आफ्रिका तसेच ऑस्ट्रेलियाने आपले सर्व उर्वरित सामने जिंकले, तर भारताला अव्वल दोनमध्ये स्थान मिळवता येणार नाही. उर्वरित दोन्ही सामने मोठ्या फरकाने जिंकणे आणि दक्षिण आफ्रिकेने किमान एक सामना गमावणे हा भारतासाठी उपांत्य फेरी गाठण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे.

### दुसऱ्या स्थानासाठी तगडी फाईट

भारतीय संघाविरुद्ध विजयानंतरही दक्षिण आफ्रिकेचा संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे. त्यांची निव्वल धावगतीही उणे आहे, मात्र उर्वरित दोन सामन्यांत दक्षिण आफ्रिकेचा मार्ग भारताच्या तुलनेत अधिक सोपा दिसत आहे. ‘अ’ गटात ऑस्ट्रेलिया भक्कम स्थितीत आहे. दुसऱ्या स्थानासाठी भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यात तगडी फाईट असल्याचे चित्र या सामन्यानंतर निर्माण झाले आहे. दोन्ही संघांनी उर्वरित सामने जिंकले, तर उपांत्य फेरीचे तिकीट नेट रनरेटवर ठरण्याची शक्यता आहे. भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान ऑस्ट्रेलियाचे असेल.


# वरुण चक्रवर्ती आयर्लंडविरुद्धच्या मालिकेतून बाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने घरच्या मैदानावर शानदार खेळ करत अफगाणिस्तानविरुद्धचा एकमेव कसोटी सामना तसेच तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका ३-० अशी जिंकली आहे. आता भारत आयर्लंड दौऱ्यावर जाणार आहे. अशात भारतीय संघात निवड झालेल्या वरुण चक्रवर्तीला दुखापतीमुळे मालिका सोडण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे.



या दौऱ्यामध्ये दोन सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाणार आहे. वरुण आंतरराष्ट्रीय टी-२०मधील नंबर वन गोलंदाज आहे, मात्र आयपीएलमध्ये डाव्या पायाला झालेल्या दुखापतीमुळे तो मालिकेतून बाहेर झाला आहे.




# यशस्वी जैस्वालकडून वडिलांना कार गिफ्ट



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वाल याने फादर्स डेनिमित्त वडिलांना एक महागडी आलिशान कार भेट दिली आहे. यशस्वी नुकताच अफगाणिस्तानविरूद्ध वनडे मालिकेत खेळताना दिसला होता. अखेरच्या सामन्यात त्याने दणदणीत शतक झळकावत संघाला विजय मिळवून दिला.

‘फादर्स डे’च्या निमित्ताने यशस्वीने आपल्या वडिलांना एक आलिशान कार भेट दिली. यशस्वीचा भाऊ तेजस्वी याने या सुंदर क्षणाचे फोटो आपल्या इन्स्टाग्राम हँडलवर शेअर केले. यशस्वी त्याच्या संपूर्ण कुटुंबासह नवी कार घरी घेऊन येण्यासाठी शो रूममध्ये पोहचला होता. त्याचे आई-वडील अत्यंत साध्या कपड्यांमध्ये या फोटोमध्ये दिसत आहेत.

एकेकाळी तंबूत राहत क्रिकेटसाठी दिवसरात्र मेहनत करणाऱ्या यशस्वी जैस्वाल पाणीपुरीच्या स्टॉलवर उदारनिर्वाह करणाऱ्या त्याच्या कुटुंबाला एक अमूल्य क्षण दाखवला. विशेष म्हणजे, यशस्वीने आपल्या वडिलांना भेट म्हणून दिलेली कार ‘मर्सिडीज जीएलएस’ असून तिची किंमत सुमारे १.३२ ते १.४२ कोटी रुपये आहे. वडिलांना कार गिफ्ट दिल्यानंतर यशस्वीचे सोशल मीडियावर कौतुक केले जात आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com